# आनंदलहरी

## श्री दत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचने

भाग - ८

मधुकर ढवळी
२५।१०।०८

# आनंदलहरी

## श्री दत्तमहाराज कवीश्वर

## यांची

## प्रवचने

## भाग - ८

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस
गुरुद्वादशी (अश्विन कृ. १२, शके १९३०)
शनिवार, दि. २५ ऑक्टोबर २००८

मुखपृष्ठ
आमोद दामले

मुद्रक
रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२३२९१०३४

प्रकाशक
श्री दत्त आश्रम संस्थान
प. पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांती नगर समोर,
जालना – ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२ २३६८०५

॥ श्री गुरुदेव दत्त ॥

***शुकासारीखे पूर्ण वैराग्य ज्याचे ।***
***वसिष्ठापरि ज्ञानयोगेश्वराचे***
***कवि वाल्मिकासारीखा मान्य ऐसा ।***
***नमस्कार माझा सद्गुरु रामदासा ॥***
***जय जय रघुवीर समर्थ ॥***

समर्थांच्या तप प्रभावाने महाराष्ट्र प्रांतामध्ये जागृती झालेलीच आहे. त्यांनी केलेली आहे. सज्जनगडावरुन प्रतिवर्षी समर्थांच्या पादुका मद्रास प्रांतामध्येही जातात. सर्वही ठिकाणी समर्थांचा संचार झालेला आहे.

धुळ्याच्या माननीय शंकरराव देवजींनी सर्व भारतामध्ये प्रवास करुन जेवढं समर्थांचे वाङ्मय त्यांना मिळाले ते सगळंही त्यांनी तिथे एकत्र करुन ठेवलेले आहे. समर्थांचे विचार किती आहेत, ते आत्ताच आपल्या माननीय श्री राजदत्त यांनी सांगितलंय. काय लिहीले नाही समर्थांनी? सर्वही विषयांचे त्यांनी मार्गदर्शन केलेले आहे. तर ते एक मोठं काम आहे. तिथे त्यांनी समर्थांच्या मूर्तीची स्थापना मागच्या महिन्यात केलेली आहे. आणि त्या ठिकाणी इतकं वाङ्मय समर्थांचे, आयुष्यभर हिंडून शंकररावजी देवांनी गोळा करुन ठेवलेले आहे. ते पहाणं, त्याचा अभ्यास करणं, त्यानंतर त्याचा प्रसार करणं हे कितीतरी मोठं काम आहे. ती मंडळी करताहेत. कार्य त्यांचं चालू आहे, हळूहळू.

त्यांनी, समर्थांनी स्वत: सर्व एकंदर संसाराचा त्याग केला असे आरंभाला तरी दिसत आहे. ''हे विश्वची माझे घर'' हे त्यांना

दाखवायचे होते. म्हणून आपलं स्वत:चं घर आहे ते सोडून दिलं. मातेला सुद्धा सोडून दिलं. सगळं सोडून बाहेर पडले. रामरायांची कृपा संपादन करावी, ब्राह्मतेजाची अभिवृद्धी करावी, त्या करता गायत्री पुरश्चरण केलं. माधुकरी मागून हे सगळं केलं. आणि नंतर सर्वही भारतामध्ये संचार त्यांनी केलेला आहे.

लोकस्थिती काय आहे? लोकांची मनं कशी आहेत? तयार आहेत का अपूर्ण आहेत? हे सगळंही त्यांनी पाहिलेलं आहे. पायांनी संचार केला. त्यांना काही आणखी वाहनांची सोय राजशासनाकडून झाली नव्हती. त्यावेळेला कुठलं राजशासन? ''मतामतांचा गलबला'' म्हणून त्यांनी सांगितलेलं आहे. आत्ताही तशीच स्थिती आहे. पण समर्थ मात्र प्रत्यक्ष नाहीयेत. ही फक्त एवढी उणीव आहे.

अशा प्रकारचे महात्मे स्मर्तृगामी असतात. स्मरण केल्याबरोबर येऊन, अव्यक्त रुपाने, बुद्धीला प्रेरणा देतात. ज्यांची बुद्धी अशा प्रकारे चांगली सात्विक, संस्कारसंपन्न असेल, त्या बुद्धीलाही जास्तीत जास्त उन्नत करुन आणखी कार्य करण्याची शक्ती त्यांच्याकडे आहे. ''तनु त्यागिता किर्ती मागे उरावी'' हा मोठा सिद्धान्त त्यांनी सांगितलेला आहे. शरीर असेपर्यंत कीर्तीची अपेक्षा करु नये हाही त्याचा अर्थ आहे. कार्यरत असले पाहिजे. ''यत्न तो देव जाणावा'' हा आणखी एक सात्विक प्रयत्न आहे. ईश्वराला शास्त्राला संमत अशा प्रकारचा. 'समाज हितकारी' अशा प्रकारचा प्रयत्न हाच देव आहे. नियमानुसार शास्त्राचा हाच सिद्धांत आहे. ''तस्मै नम: कर्मणे'' म्हणतात. कर्म हेच नमस्कारार्थ आहे. कर्म हाच ईश्वर आहे.

तर ते कर्तव्य कर्म करीत असले पाहिजे. त्यावेळेला कीर्तीची

अपेक्षा करु नये. कीर्तीची अपेक्षा मनामध्ये उत्पन्न झाली की कर्मामध्ये न्यूनता येते, आणि अपूर्णता कायम राहाते. गुणज्ञ अशा प्रकारची जी सात्विक प्रकृतीची मंडळी आहेत, प्रत्येक आणखी गावामध्ये असतात, नाही असं नाही. अनुकूल काळ, प्रतिकूल काळ सर्वही द्वंद्वात्मक विश्व आहे. त्यामध्ये प्रतिकूलही परिस्थिती असेल, काळ असेल पण अनुकूलही असतो. बुद्धी अनुकूल आहे. त्याचप्रमाणे सर्वही कार्य, चांगली कार्य – त्याबद्दल आस्था आहे. आणि सत्कार्य घडावी. प्रगट करता आली नाही तरी अप्रगट रीतीने का होईना करावी, अशा प्रकारची मानवांची बुद्धी आहे. छत्रपती राजे ज्या वेळेला होऊन गेले त्या वेळेला ते कुठंतरी आणखी महादेवाच्या मंदिरात बसून, आपल्या बरोबरची दहा पांच मंडळी मिळवून त्यांच्या बुद्धीला ते पटवून देऊन असं आणखी करावं लागलं.

तर हे जरी आणखी अशा प्रकारचं असलं तरी समर्थांची ज्ञानशक्ती आणखी छत्रपतींची क्रियाशक्ती ह्या दोन्हींचा समन्वय झाल्यामुळे आणि तशाही कठीण परिस्थितीमध्ये, इतकी कठीण परिस्थिती असतानाही हे लोकशाही आहे असं म्हणतात, राजशासनही तसंच आम्ही लोकशाहीने वागतो आहोत असं सांगताहेत. तशा या स्थितीमध्ये आणि तितकी कठीण परिस्थिती नाहीये. कुठं शिबिरं घ्यायची, काय घ्यायची, कल्पनाही नाही लोकांना. जो तो अगदी भीतीग्रस्त झालेला आहे. गांवामध्ये आत्ता आपण आहोत, पुन्हा काय कोणत्या क्षणी, कित्येक तासांनी काय होतं, कुणाचा एकंदर हल्ला होतो काय होतं, अशा प्रकारची कठीण परिस्थिती आहे. त्या वेळेला होती. तरी धैर्य होतं शिवाजी राजांना समर्थांची प्रेरणा मिळाली. त्यांची ही दैवी प्रकृती होती. त्या दैवी

प्रकृतीचं पहिलं लक्षण –

***अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थित: ।***
***दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥***

भगवान् सांगत आहेत की दैवी प्रकृतीचे पहिले लक्षण म्हणजे निर्भयता आहे. ही निर्भयता त्यांची लहानपणापासून आहे. विजापूर राजधानीमध्ये एका खाटकाचा हात त्यांनी रस्त्यामध्ये तोडून टाकलेला आहे. त्यांचे पिताजी तर त्या राजाचे आणखी सचिव होते म्हणा, नोकर होते. पण काही विचार नाही. अन्याय दिसल्यानंतर क्षमा नाहीये. पुढे काय होईल याचा विचारही नाही आहे.

हे सात्विक धैर्याचे लक्षण आहे.

***धृत्या यया धारयते मन:प्राणेंद्रियक्रिया: ।***
***योगेनाव्यभिचारिण्या धृति:सा पार्थ सात्त्विकी ॥***

सात्विक धैर्याचे लक्षण भगवान् सांगत आहेत. ते सात्विक धैर्य आणखी मनामध्ये असलं पाहिजे. व्यक्त जरी झालं नाही तरी हरकत नाही. एखादा कुणीतरी महात्मा महापुरुष येतो. भगवान् शंकराचार्यांचा तोही अवतार होऊन गेला. सर्वही वैदिक धर्माचा लोप होण्याची पाळी आलेली होती. कुठं कालडी क्षेत्र केरळमध्ये आहे. इकडं बद्रीनारायणापर्यंत येऊन, ग्रंथ लिहून, सगळ्या लोकांमध्ये स्वत: जाऊन, चर्चा, वादविवाद करुन, त्या त्या आणखी पक्षाचे, त्या त्या मताचे लोक आहेत, त्यांच्या बरोबर वादविवाद करुन एकंदर वैदिक संस्कृतीचे सिद्धान्त त्यांनी आणखी स्थापन करुन दिलेले आहेत. त्यामुळे पुढे होऊन गेलेली सगळीही संत मंडळी प्राय: त्यांचीच आणखी अनुयायी अशा प्रकारची आहेत. त्यांच्याच मतांचा आणखी पुरस्कार करणारी सगळी ही संत मंडळी आहेत.

''भाष्यकाराते वाट पुसतु'' म्हणून ज्ञानेश्वर महाराजही म्हणतात. त्यात बुद्धिवादाने काहीतरी अर्थ काढायची पद्धती आहे सध्या. भाष्यकार अनेक झालेले आहेत. हेच भाष्यकार कशावरुन? म्हणजे भेदनीतीने प्रत्येक ठिकाणी आणखी भेद उत्पन्न करण्याचा बुद्धिवाद हा आहे. असू दे. परंतु दैवी प्रकृतीचे जे महात्मे, जीवात्मे जन्माला आलेले असतील त्यांचा बुद्धिभेद कधीही होत नाही. त्यांना अशा प्रकारचे महात्मे, सत्पुरुष भेटतात. त्यामुळे त्यांची बुद्धी आणखी स्थिर राहाती. स्थिर बुद्धीच्या लोकांकडूनच काहीतरी कार्य होते. अस्थिरतर बुद्धी असल्यानंतर काही कार्य होऊ शकत नाही.

आजच्या काळामध्ये आणखी समर्थ वाङ्‌मयाचा अभ्यास हा अधिकाधिक झाला पाहिजे. समर्थांनी जे विचार मांडलेले आहेत, वेदांत शास्त्रामध्ये व्यवहार सत्ता निराळी असे आणखी वेगळे वेगळे प्रकार त्यांनी केले आहेत. स्वप्नामध्ये असेपर्यंत त्यावेळची सत्ता निराळी आहे. त्यावेळेला ते खरं आहे. पण नंतर ते असत्य आहे. अनुभवाने सिद्ध होतं. तसे काही सिद्धान्त आहेत. परंतु ते सिद्धांत व्यवहारामध्ये आणखी आपल्याला व्यवहारही करु देणार नाहीत आणि परमार्थ तर प्राप्त होणेच शक्य नाही. म्हणून वेदान्ताचे चिंतनसुद्धा कोणी करावं, त्याचाही अधिकारी कोण आहे हेही त्यांनी ठरवून ठेवलेलं आहे.

साधनचतुष्टय संपत्ती म्हणून जी सांगितलेली आहेत शास्त्राने– विवेक, वैराग्य इ. ही सगळी साधनं ज्यांच्याजवळ आहेत त्यांनी वेदांताचा विचार करावा आणि आपली उन्नती त्या क्षेत्रामध्ये करुन घ्यावी. पूर्ण तत्त्व जे आहे त्या पूर्ण तत्त्वापर्यंत जाण्याचा प्रयत्न करणाऱ्याला तो मोकळा आहे. त्याला व्यवहारातूनही शास्त्राने

मोकळीक दिलेली आहे. परंतु सर्वसामान्य जीवांची अवस्था तशी नाही आहे. संसारात राहूनच सगळं करायचं आहे. द्वैतातूनच अद्वैताकडे जायचं आहे. द्वैतात राहूनच आणखी आपली बुद्धी सात्विक बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सात्विक बुद्धीमध्ये हे सर्वही गुण येतात. दैवी संपत्ती ज्याला म्हणतात ते सगळेही गुण सात्विक बुद्धीमध्ये येऊ शकतात.

ती बुद्धी सात्विक बनवायची. सात्विक याचा अर्थ म्हणजे काही पूर्ण शांती, पूर्ण अहिंसा असा त्याचा अर्थ नाहीये. पूर्ण अहिंसा कोणीही करु शकत नाही. पूर्ण झालेला, ईश्वरस्वरुप झालेला जो आहे त्यालाच फक्त पूर्ण अहिंसा माहिती आहे. तो करु शकतो. आचरण करु शकतो. इतरांना तशी अहिंसा शक्य नाही आहे.

• द्रोणाचार्य अनावर झाले. रागावले. पांडवांचा विनाश होण्याची पाळी आली. अशा वेळेला श्रीकृष्णाने आणखी त्या भीमाला सांगून एक अश्वत्थामा नांवाचा कौरवांच्या सैन्यांतला हत्ती मारला, मारविला त्याने आणि अश्वत्थामा 'मेला मेला' म्हणून सगळीकडे आणखी धून उंठविली आहे. द्रोणाचार्यांच्या कानामध्ये हे जावं आणि त्यांचा युद्धाचा आवेश काही कमी व्हावा असा त्याचा उद्देश आहे. युद्धाच्या क्षेत्रामध्ये आल्यानंतर त्याप्रमाणे वागलं पाहिजे. द्रोणाचार्यांना आणखी समजलं. हे शक्य नाही. असंभवनीय आहे. अश्वत्थामा मारला कसा जाईल? इतकी अस्त्रविद्या त्याला दिली. त्याला आणखी पूर्ण तयार केला. हा कसा केला? धर्मराज कुठे आहेत? अजातशत्रू धर्मराज आहे. जरी कौरवाचे सेनापती द्रोणाचार्य होते तरी द्रोणाचार्यांचा विश्वास धर्मराजांवर आहे. धर्मराजांनी जर सांगितलं, अश्वत्थामा मेला तर शस्त्रसंन्यास करावयाचा.

गोपाळकृष्णांनी धर्मराजाला विचारलं, काय सांगणार, बाबा, तू आता? द्रोणाचार्यांनी जर तुला विचारलं की अश्वत्थामा मेला हे खरं आहे काय तर तू काय सांगणार? तो म्हणाला काय खरं असेल ते मी सांगणार. हत्ती मारलेला आहे.

खरं ! मग इथं कशाला आलास? बारा वर्षे नाही आणखी तिथं वनातच रहायचं होतं ! तुला जर सत्याचं पालन करायचं असेल, इतकी सगळी मंडळी आज जर तुला सांगताहेत आणि तू जर सांगितलंस की अश्वत्थामा जिवंत आहे व हत्ती मारलेला आहे तर हा म्हातारा इतका संतापून उठेल की तुम्हा पांडवांपैकी कोणीही जिवंत राहाणार नाही. हे सत्य आहे काय? सत्य म्हणजे भूतहित आहे. ''सत्यं भूतहितं प्रोक्तं'' म्हणतात. तेव्हां सत्याचं पालन पूर्णव्रत ज्याला म्हणतात ते महानव्रत – तुला करता येणार नाही. अल्पोव्रत आहे. बाकीची ही सगळी मंडळी आहेत म्हणजे सत्य सर्वथा सोडून द्यावं असं नाही. सत्याचाही अभ्यास बाकीच्या व्यवहारातल्या सगळ्याही अपूर्ण जीवांनी करायचा आहे पण तो अल्पव्रत म्हणून करायचा आहे. केव्हाही मी खोटं बोलणार नाही, कोणत्याच दिवशी नाही, कोणत्याही ठिकाणी मी खोटं बोलणार नाही असं शक्यंच नाही. निदान अशा शिबिराला गेलं, मंदिरात गेलं म्हणजे तिथे असेपर्यंत खोटं बोलणार नाही एवढं तरी व्रत पाळावं. अल्पव्रत म्हणतात त्याला. अभ्यास करण्याकरता. अभ्यासी स्थिती आहे तुमची, म्हणून त्याला सांगितलं. शेवटी त्याने काय सांगायचं ते सांगितलंच. संदेह म्हणजे ही स्थिती. गोपाळकृष्णांनासुद्धा सांगावं लागलं त्याला.

सत्याचं पालन पूर्ण होऊ शकत नाही, पूर्ण अहिंसेचं पालन

पूर्ण होऊ शकत नाही, आणि काही तरी मनाचा गोंधळ झाल्यामुळे आणखी सगळ्या समाजामध्ये वाताहात होऊन जाते. म्हणून व्यवहार व्यवस्थित रीतीने आपल्याला करता आला पाहिजे. ''आधी प्रपंच करावा नेटका'' म्हणतात. प्रपंच म्हणजे सगळा व्यवहार. नुसता वैयक्तिक प्रपंच नाही. सामाजिक प्रपंचामध्ये सुद्धा आपली बुद्धी कशी स्थिर राहिली पाहिजे. व्यवस्थित राहिली पाहिजे हे समजले पाहिजे.

दामाजीपंतांनी आणखी दुष्काळाच्या वेळेला बादशाहाचं सगळं धान्य सर्व जनतेला देऊन टाकलेलं आहे. बादशाहांची आज्ञा मिळेल, त्यांच्याकडे पाठवू, आता अर्ज करु आणि त्यांची आज्ञा मिळाल्यावर धान्य देऊन टाकू. तोपर्यंत हे जिवंत राहतील कशावरुन? कोणाकरता धान्य साठवलेलं आहे हाही विचार त्यांनी केलेला आहे. शिवाय त्या बादशाहाचं धान्य, आपलं स्वत:चं धान्य, आपल्या मोठेपणाकरता त्यांनी दिलेलं नाही. तर बादशाहाचंही कल्याण व्हावं आणि जनतेचंही स्वास्थ जनतेला मिळावं या करता ते धैर्याने देऊन टाकलेलं आहे. परिस्थिती काय होईल ते भोगण्याची मनाची तयारीही ठेवलेली आहे. अशा प्रकारचा अधिकारी जर असेल तर जनतेचंही कल्याण होईल. आणि शासनकर्ते जर गुणज्ञ असतील तर ते त्यांच्या गुणांचं चीज करणारे भेटले तर त्यांचं कल्याण होतंच आहे.

तर व्यवहारामध्ये असं आपल्याला वागता आलं पाहिजे. कोणी नियामक असो, नियम्य असो, सर्वही स्थितीमध्ये व्यवहार आपला कसा ठेवला पाहिजे, हे सगळंही आणखी शास्त्राला अनुसरुन सामाजिक परिस्थितीसुद्धा बिघडू नये या करता असं शिक्षण पाहिजे. व्यवहारात राहूनही हे सगळंही समर्थांनी आपल्या अप्रतिम बुद्धीच्या द्वाराने भगवंताचे अधिष्ठान ठेवून ते सांगितलेलं आहे.

शिवाजी राजांनी राज्याभिषेक झाला, राज्य स्थापना झाली. पुन्हा काही तिकडे लक्ष नाही. त्या देवीला प्रार्थना केली, ''तुझा तू वाढवी राजा'' तुझा राजा आहे, म्हणाले. तू शक्ती आहेस. सर्व एकंदर सृष्टीचा प्रलय करणारी तू शक्ती आहेस. तुझ्या कृपादृष्टीने प्रेरणेनं हा राजा झालेला आहे. तेव्हा त्याची अभिवृद्धी करणं म्हणजे समाजाची अभिवृद्धी करण्यासारखं आहे. संरक्षण कर्तृत्व जे ईश्वराला आहे ते यामुळे आहे. अशाच प्रकारचा नेताही त्यांनी बनविला पाहिजे. त्याच्या कृपेशिवाय नेता, हा स्वत:च्या प्रयत्नांनी होऊ शकत नाही. त्याला आणखी ईश्वरी कृपा पाहिजे, असे महात्मे भेटले पाहिजेत. महात्म्यांची भेट झाली तरीसुद्धा त्यांचे म्हणणे योग्य आहे. हे समजण्याची आपली बुद्धी पाहिजे. अहंकाररहित बुद्धी पाहिजे. तर त्यांच्या मार्गदर्शनाचा उपयोग होऊ शकेल. बुद्धी जर चांगली नसेल तर महात्म्यांची भेट होऊन काही उपयोग नाही.

भरताने राज्य केलं, आणि दुर्योधनानेही राज्य केलं. चित्रकूट पर्वतावर प्रभु रामचंद्र जिथे राहात होते तिथे भरत आलेला आहे. त्याला सगळं समजलं. मातेनं सगळं हे केलं. वाईट वाटलं त्याला. आणखी रामचंद्रांना परत आणावं म्हणून तो चित्रकूट पर्वतावरती गेला असताना लक्ष्मणाच्या मनात संशय उत्पन्न झाला. हा भरत सगळं सैन्य घेऊन येतो आहे. त्याला राग आलेला आहे. तो म्हणाला, हा तुम्हांला काहीतरी कैद करण्यासाठी येत आहे. ''नाही'' रामचंद्र म्हणाले, ''त्याची बुद्धी चांगली आहे.'' कुणाची बुद्धी वाईट आहे, कुणाची बुद्धी चांगली आहे हे सगळं समजण्याची शक्ती पाहिजे. त्यागी महात्मा जो आहे तो सगळं ओळखू शकतो.

आलेला आहे भरत. प्रार्थना केली, ''महाराज हे राज्य आपलं

आहे आपण घ्या'' ''नाही'' म्हणाले, ''पित्याची आज्ञा आहे ना ! त्याला धर्मसंकटातून मुक्त करण्याकरता तू तुझे कर्तव्य केले पाहिजेस आणि मी माझे करणार. वनवासामध्ये चौदा वर्षे मला रहावं लागेल'' रामचंद्र चौदा वर्षे वनाच्या हद्दीतच राहिले आहेत. सुग्रीवाने राज्याभिषेक करण्याच्या वेळेला त्यांना प्रार्थना केली ''आपण किष्किंधानगरीत राजधानीमध्ये या'' ''नाही'', म्हणाले ''मला येता येत नाही. वनाची हद्द सोडून मला जाता येत नाही. लक्ष्मणाला घेऊन जा तुम्ही. होऊ दे राज्याभिषेक''.

याप्रमाणे ज्यांनी पित्याचे वचन पालन केलं आहे, मर्यादा पुरुषोत्तम म्हणतात त्यांना, असा नेता आणखी राष्ट्रापुढे समर्थांनी मुद्दाम ठेवलेला आहे. वाल्मिकींनी मुद्दाम ठेवलेला आहे. भरताला सांगितलं, तुझं कर्तव्य राज्य करायचं आहे. तुला वनामध्ये येता येणार नाही. तू राज्यंच केले पाहिजे. ''हे जरी स्वत: रामचंद्रांनी सांगितलेलं असलं तरी भरताची सात्विक बुद्धी आहे. दैवी प्रकृती आहे भरताची. ''पादुका द्या'' म्हणाला. पादुका घेऊन गेलेला आहे.

सिंहासनावरती पादुका प्रतीक रामचंद्रांचं ठेवलेलं आहे. मी एक सेवक आहे. रामचंद्रांच्या राज्याचा मी एक विश्वस्त आहे. पालक आहे. चौदा वर्षे पर्यंतच. म्हणजे ज्यावेळी राज्य सुरु केले त्यावेळेस राज्य केव्हां सोडायचं हाही मनाचा निश्चय त्याने बोलून दाखवलेला आहे. चौदाव्या वर्षाचा शेवटचा दिवस संपला. रात्र संपली, पंधराव्या वर्षाचा सूर्योदय होईपर्यंत भरत जिवंत राहील. एवढंच त्याने स्पष्ट सांगितले. म्हणून रामचंद्रांना आणखी लवकर यावं लागलं, लंकेचं कार्य आटोपून.

तर चौदा वर्षे ज्याच्या ताब्यामध्ये राज्यं होतं, रामाने दिलेलं

होतं, ते राज्य रामचंद्र आल्यावर जसेच्या तसेच व्यवस्थितपणाने सुरक्षित ठेवून आणि त्यांचं त्यांना अर्पण केलं आहे. ही जी मनाची आणखी नि:स्पृह स्थिती आहे –

'दु:खेष्वनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृह: ।'

हे एक मोठं लक्षण स्थितप्रज्ञाच्या लक्षणांमध्ये घातलेलं आहे. सुख येतील पुष्कळ पण स्पृहा नाहीये. ''दु:खेषु अनुद्विग्न मना:'' हे जसं पालन करायचं तसंच ''सुखेषु विगतस्पृह:'' हे सुद्धा मुद्दाम सांगितलेलं आहे.

ती आणखी मनाची भूमिका असणारे महात्मे जगामध्ये झालेले आहेत. रामरायांना सुद्धा आणखी बोलून दाखवावं लागलं – रामांचा त्याग जास्ती की भरताचा त्याग जास्ती आहे? कोणाचा त्याग जास्ती आहे? मिळालेलं राज्य ज्याने देऊन टाकलेलं आहे? रामचंद्रांना अजून राज्य मिळायचं होतं. राज्याभिषेक व्हायचा होता. इतक्यात आज्ञा झाली – वनामध्ये चौदा वर्षे जायचं आहे. निघाले राम ! त्यांचा त्याग मोठा आहे. काही नाही !

वसिष्ठ महर्षी म्हणतात, काय आणखी मनोवृत्ती आहे ! अभिषेकाला बोलावणं पाठवलं तरीसुद्धा मनामध्ये काही नाही. हर्ष नाही. कोणताही विकार नाही. हर्ष हाही एक विकार आहे. वनात जायचे तरीही तयारी आहे. काही विचारलं नाही. सगळे अलंकार उतरवून दिलेले आहेत. अंगावरची वस्त्रेही काढून ठेवली. इतका मोठा त्याग केलेला आहे. तरीसुद्धा राम म्हणतात माझ्यापेक्षा भरताचा त्याग मोठा आहे.

मिळालेलं राज्य जे आहे, आईनं मिळवून ठेवलेलं आहे, पित्याची अनुज्ञा मिळालेली आहे. पण याला काही चौदा वर्षांची

अट नव्हती. वनवासाला चौदा वर्षांची अट घातलेली होती. म्हणजे कायमचं राज्य भरताकडे होतं. पण त्याने ते सोडून दिलेलं आहे. हे नेतृत्व आहे. रामचंद्रांच्या नेतृत्वाचा हा प्रभाव आहे. पहिल्या दिवशी राज्य ग्रहण करताना जी बुद्धी आहे ती शेवटी अर्पण करतानाही कायम राहीली होती.

आणि दुसरे उदाहरण दुर्योधनाचे आहे. कपटाने जिंकून राज्य घेतले. तरी आणखी वनवासामध्ये पांडव गेलेले आहेत. अज्ञातवासासारखी भयंकर अट त्याने घातलेली होती. अज्ञातवासात जर पांडव प्रकट झाले तर पुन्हा बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास. म्हणजे संपूर्ण आयुष्य पांडवाने वनामध्येच रहावं असं आपलं बुद्धीचं चातुर्य कौरवांनी प्रगट केलेलं आहे. आपल्या शेवटपर्यंत राज्य मिळालं पाहिजे. ''लोभंमूलानि पापानि'' परंतु पांडवांना शेवटपर्यंत वनवासामध्ये ठेवण्याची व्यवस्था केली खरी कौरवांनी परंतु सज्जनांचं जे काही महत्त्व आहे ते महत्त्व दुर्जनांनासुद्धा मान्य करावं लागतं. अज्ञातवासामध्ये पांडव अज्ञात राहू शकणार नाहीत. खात्री आहे कौरवांना. त्यांना आपण केव्हांच शोधून काढू किंवा ते प्रगट होतील. त्यांच्या गुणांनी म्हणजे पांडव गुणी आहेत याला मान्यता दिल्यासारखं आहे. अज्ञातवासाची अट घालणे म्हणजे पांडवांचे गुण मान्य करण्यासारखं आहे.

तेरा वर्षे राज्य ताब्यामध्ये आहे. सगळी सत्ता आहे. त्याचप्रमाणे सगळा खजिना आहे. सैन्य आहे. सगळं आहे. तरी कबूल केल्याप्रमाणे आणखी बारा वर्षे वनवास झाला. अज्ञातवास झाला. द्यायला पाहिजे राज्य. एकेक गांव दिलं जरी तरी पुरे आहे म्हणाले धर्मराज. म्हणाले नाही. तो जो काही अभिमान म्हणा किंवा अभिनिवेश जो आहे,

लोभाने बुद्धी व्याप्त झाल्यामुळेसुद्धा. शिवाय राज्य नाही. केवढा भयंकर प्रसंग आहे ! सगळं राष्ट्र, राष्ट्रातली सगळी तरुण पिढी नाहीशी झाली त्या युद्धामध्ये. तर ही स्थिती आहे. भरतानेही राज्य घेतले. राज्य केले. दुर्योधनाने राज्य घेतले. घेतानाच ते कपटाने घेतले. तर देताना आणखी अशा प्रकारचं युद्ध करुन. सर्वनाश करुन दिलेलं आहे, स्वत:चाही.

तेव्हां ही बुद्धी कोणती बुद्धी चांगली आहे. व्यवहारामध्ये असं वागलं पाहिजे. आरंभाला जरी दु:ख झालं तरी सुद्धा सात्विक प्रयत्नशील महात्मा, जीवात्मा हा शेवटी सुखी होतो आहे. आणि सुखदु:खेही मनुष्यावरती आहेत. कर्तव्यकर्म करणं हेच आणखी सुख आहे. सुख निराळं कशाला मानायचं आहे ! असे विचार शिकवण्याकरता आणखी समर्थांचा अवतार मारुतीरायांनी घेतलेला आहे. स्वत: ''बुद्धिमतां वरिष्ठम्'' त्यांनी जगात येऊन हे सगळे शिकवले आहे. स्वराज्य स्थापना त्याच काळात करुन दाखवलेली आहे. आपली बुद्धी सांभाळण्याचा प्रयत्न ज्यांनी केला आहे त्यांना राज्य राखता येऊ शकते. आपल्या बुद्धीकडे दुर्लक्ष करुन आणि त्या बुद्धीमध्ये लोभाधिक विकार उत्पन्न झाल्यानंतर शिवाजी राजांनी मिळवून दिलेले राज्य पुढे कसे टिकणार? पुढे तर आणखी उन्नतीचे सगळे मार्ग बंद झाले. बुद्धीच बंद झालेली आहे त्याला काय करणार? परंतु हे अशा प्रकारचं त्यांनी (समर्थांनी) दाखवलेलं आहे. आणि आपल्या ग्रंथरुपाने सगळं आणखी मार्गदर्शन करुन ठेवलेलं आहे.

ते मार्गदर्शन पहाण्याकरता म्हणून आणखी वर्षातून काही दिवस आपण जमायचं आहे इथं. ही योजना जी केलेली आहे निदान हे विचार चांगले आहेत. चांगले विचार ऐकण्याची इच्छा होणे हे सुद्धा

आणखी चांगलं लक्षण आहे. ईश्वराची ही कृपाच आहे असं म्हणायला हरकत नाही. आपण आज विचार करु शकतो. तशी काही त्या वेळेसारखी परिस्थिती नाहीये.

तेव्हां जास्तीत जास्त या विचारांचा आणखी सप्रसार होणं. प्रसार याचा अर्थ बुद्धीमध्ये ते राहिलं पाहिजे. बुद्धीमध्ये असलेले जे काही आणखी दोष आहेत ते दूर झाले पाहिजेत. मनावर संस्कार करायचा. ''संस्कार'' याचा अर्थ आचार्यमहाराजांनी ''दोषमायां गुणाधारं च संस्कार'' असा सांगितला आहे. मनामध्ये काय काय दोष आहेत, समष्टीच्या मनामध्ये, व्यष्टीच्या मनामध्ये, कोणकोणते दोष आहेत, याचं निरीक्षण करणे आणि ते दोष दूर करण्याचे उपाय काय सांगितले आहेत. ज्यांचं निर्दोष मन आहे त्यांनी सांगितलेले उपाय कोणते आहेत त्याप्रमाणे आचरण करणं. व्यष्टी आणि समष्टी या योगाने मन हे सुसंस्कृत होऊन जात आहे. आता सगळे दोष मनातले दूर झाले आणखी गुणाधार जर मनामध्ये झाला आहे, हे संस्कृत मन जर झालं तर त्या संस्कृत मनाने सर्वही कार्यसिद्धी होऊ शकते. हे आणखी आपल्या पूर्वीच्या एकंदर मारुतीरायांच्या उदाहरणावरुन आपल्याला दिसून येत आहे. काही भीती नाही. लंकेत जाऊ शकतो मी. बाकी सगळे वानर. शंभर योजने विस्तीर्ण समुद्र आहे. एवढ्या पलीकडे जायचं कुणाची शक्ती आहे? अंगद म्हणाला, ''मी जाईन, पण परत येता येणार नाही.'' जायचं, परत यायचं दोन्ही शक्ती पाहिजे. हे जातो म्हणाले. गेलेले आहेत. मी एकटा आहे, मला सहाय्याला कोणी नाही.

अभिमन्यू एकटा जायला निघाला त्या चक्रव्यूहात. नुसती चक्रव्यूहात तेवढी जायची माहिती होती. जा बाबा, पाठीमागे तुला

सहाय्य आहे. मारला गेला अभिमन्यू.

तशी नाही, जाण्याचीही शक्ती आहे, परत येण्याचीही शक्ती आहे. कोण आहे, रावणाचा काही पत्ता नाही. काही माहिती नाही. किती बलाढ्य आहे. किती त्याचं सामर्थ्य आहे. काही नाही. रामचंद्रांची सीता घेऊन जाणारा म्हणजे तर मोठा असला पाहिजे. काहीही असेल, जाऊन त्या सीतेचा शोध करुन, सीतेचं समाधान करुन आणि ते कार्य झालेले आहेत. तर हा जो आत्मविश्वास आहे, आत्मशक्तीच्या संबंधी. अपूर्ण जीवात्मा परंतु पूर्ण शक्तीशी जर त्याचा संबंध जोडला गेला, ''भगवंताचे अधिष्ठान'' पाहिजे म्हणतात, त्या भगवंताच्या पूर्ण शक्तीशी आपला संबंध जर जोडला जाईल तर ती ईश्वराचीच शक्ती होत आहे. एक जीवात्मा अशा प्रकारचे अलौकिक कार्य करु शकतो, अशी उदाहरणे आहेत.

परंतु समष्टीरुपाने का होईना ''संघे शक्ती: कलीयुगे'' म्हणतात. कलीयुगात एकाच व्यक्तीची शक्ती काही कार्यकारी ठरत नाही म्हणून समुदाय शक्तीला त्यांनी विशेष महत्त्व दिले आहे. ती समुदायाची मन:शुद्धी झाली पाहिजे. ती मन:शुद्धी, ती बुद्धी, त्या बुद्धितत्वाचा विकास हा मुख्य मानला आहे. शास्त्रकारांनी, ऋषीमंडळींनी बुद्धीला प्राधान्य दिलेले आहे. आणि ती बुद्धी जर उत्तम राहीली तर सगळं राष्ट्र राहाणार आहे. स्वराज्य मिळवून आणखी बुद्धी जर कायमचीच खाली खाली जात चालली, कोणते गुण आहेत? कोणते दोष आहेत ह्याचा सुद्धा बुद्धीला काही विचार राहिलेला नाहीये. कोणत्या वेळेस आणखी राग आला पाहिजे, कोणत्या वेळेला दया, कृपा केली पाहिजे हाही विचार जर बुद्धीमध्ये राहिला नाही तर राष्ट्राचं कार्य होणार कसं? परमार्थाला अविरोधी

व्यवहार हा आहे. तो सगळा व्यवहार उत्तम शिकवून नंतर परमार्थाकडे न्यायचं आहे.

समर्थांची दृष्टी असा उत्तम व्यवहार करणारा, कर्तव्यकर्म हाच परमेश्वर आहे असं समजून कार्य करणारा, जो कर्मयोगी महात्मा आहे तो निर्माण झाला पाहिजे. लोकमान्यांचासुद्धा हाच उद्देश्य होता. कर्मयोग सुटला म्हणाले. त्यांनी शंकराचार्यांवर काही आक्षेप घेतले असतील त्याचा उद्देश निराळा आहे. उगीच वेदांत वाचून उगीच हे करु. हेही नाही आणि तेही नाही. संसार सोडू शकतो का? शक्य आहे का? म्हणून केवळ आपल्या कर्तव्यकर्माकडे लक्ष दिलं पाहिजे, प्रत्येकाने. हाच मुख्य उद्देश्य आणखी श्रेष्ठपुरुषांचा आहे. भगवान् श्रीकृष्णांचाही हाच उद्देश आहे. अर्जुनाला त्यांनी मुद्दाम तयार केले. श्रेष्ठ पुरुषांची बुद्धी अशी आणखीन हीन होऊन उपयोग नाही. श्रेष्ठ पुरुषांची बुद्धी जर मार्गभ्रष्ट झाली तर समाजाचं कल्याण होणार नाही. म्हणून अर्जुनाचं कल्याण करण्याकरता गीताज्ञान प्रगट केलेलं आहे आणि ते ज्ञान फक्त अर्जुनाकरता झालेले नाही. सर्वांकरता प्रगट झालेलं आहे. भगवान् आचार्य महाराज सांगताहेत, अर्जुन निमित्त आहे.

असे अनेक उत्तमोत्तम ग्रंथ, संतांनी ज्यांचं वितरण केलेलं आहे अशा प्रकारचे संतांचे ग्रंथ, समर्थांचे ग्रंथ आज आपल्या समोर आहेत. त्या ग्रंथांचं मनन झालं पाहिजे. आत्ताच आपल्या राजदत्तांनी सांगितलं जसं जसं मी पहायला लागलो तसं तसं नवीन प्रकाश त्या दासबोधामध्ये व्हायला लागला. समर्थांच्या ग्रंथामध्ये. ही एक आस्थाच आहे. आदरबुद्धी पाहिजे. जिज्ञासा पाहिजे. तर त्या ग्रंथातून नवीन नवीन काय आहे ते समजू शकेल. बुद्धीमध्ये प्रकाश

होणं हे सत्वगुणांचं लक्षण आहे. आणि तशा प्रकारचा सत्वगुण बुद्धीमध्ये उत्पन्न झाला, वृद्धिंगत झाला तर वैयक्तिक कार्य नाही, सामुदायिक कार्य संपूर्ण विश्वालासुद्धा तो मान्य अशा प्रकारचा नेता होऊ शकतो. रामराज्य पाहिजे नुसते म्हणतो आपण याही काळामध्ये. काय रामराज्य होते, कसे होते, त्यांनी केलेलं वर्णन नुसतं पाहिलं म्हणजे आश्चर्य वाटते. मृत्युची इच्छा ज्याला नाही त्याला मृत्यु येत नसे रामराज्यामध्ये, हे त्यांनी लक्षण राम राज्याचे दिलेले आहे. इथंच रहायचंय मला. रहा. काही हरकत नाही. मृत्युसुद्धा नेऊ शकणार नाही. ही इतकी सत्ता जी आहे, हा जो दरारा आहे, नुसत्या मानवाला नाही. यमधर्म वगैरे त्यांना सुद्धा आणखी दरारा यांच्यावरती आहे. अशा प्रकारचे जे राज्य आहे ते राज्य म्हणजे ह्या सात्विक यत्नाचे हे फळ आहे. धर्ममर्यादेचे पालन शेवटपर्यंत रामरायांनी केलं आहे. एकही मनुष्याचं मत माझ्याविरुद्ध असून उपयोगी नाही. बिभीषणाने आणली सीतेला. घेऊन चला महाराज. ही शुद्ध आहे सीता. लंकेमध्ये रावणाचा नाश झाला. सीतेने अग्निप्रवेश केला. अग्निनारायण प्रगट झाले. त्यांनीच स्वत: सांगितले सीता शुद्ध आहे म्हणून.

याचा अभिप्राय काय आहे? त्यांना आणखी पत्नीबद्दल प्रेम नाही? आणखी नुसत्या राज्याकडे लक्ष आहे असा अर्थ नाहीये. जो आणखी अपराधी असेल समाजामध्ये स्वत:ची पत्नी जरी असली तरी त्यांनी आपलं निरपराधित्व सिद्ध करुन दाखवायला पाहिजे. दुसऱ्या कोणाचा फोन आला आणि अमुक आता निर्दोष सुटला असं होऊन उपयोगी नाही. हे समाजाला पटवण्याकरता म्हणून त्यांनी पत्नीचा त्याग केला असं दाखवलेलं आहे.

इतकी आणखी त्यागी पत्नी वनामध्ये राहाण्याकरता राम निघाले. मीही येणार, म्हणाली. ते म्हणाले, तिथे काय नोकर चाकर आहेत? तू जा म्हणाले. तुझ्या माहेरी जा. नाही, म्हणाली. आपल्या जवळ राहाणार. तिथेच माझी राजधानी आहे. सगळं आहे.

इतक्या त्यागी पत्नीबद्दल संशय येईल कसा? परंतु समाजाला शिकवायला लागेल. नेत्याचे कर्तव्य आहे हे. स्वत:च्या कोणत्याही वैयक्तिक गोष्टीकडे लक्ष द्यायचे नाही. काही व्यथा नाही मला. जानकीला सोडावं लागलं तरी मी सोडून देईन मी. लोकांची आराधना करायची आहे. लोकांचं मन हे सुधारायचं आहे. याकरिता त्यांनी आणखी हे केलेलं आहे. तोच नेता आपल्या समोर असला पाहिजे, म्हणून समर्थांनीही आणखी तेच ठेवलेलं आहे चरित्र. त्यांचाच आदर्श आपल्या पुढं ठेवला आहे. मारुतीरायांचाही आदर्श ठेवलेला आहे. हे अशा प्रकारचे कार्य ''आधी केले मग सांगितले''. श्रेष्ठ पुरुष होऊन गेले त्यांचं स्मरण केल्यानंतर ते आणखी जीवात्मे अविनाशी आहेत. हा सिद्धांत गीतेच्या आरंभी भगवंतांनी सांगितलेला आहे. ईश्वर तर अविनाशी आहेच.

तर हे सगळे सिद्धांत दासबोधामध्ये कळून येतील. आणखी व्यवहारसुद्धा कसा उत्तम केला पाहिजे की ज्या योगाने स्वत:च्या समाजाचे, राष्ट्राचे सगळ्यांचेही हित करता येईल. ''भूता परस्परे पडो मैत्र जीवांचे'' म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनीही प्रार्थना केलेली आहे. सर्व लोकांनी आणखी मैत्रीने रहावं, ही त्यांची जीवाभावाची मैत्री सगळ्या लोकांची असावी अशी प्रार्थना म्हणजे राष्ट्राला केवढी उपयोगी आहे ! प्रत्येकाचा अभिप्राय निराळा, प्रत्येकाची मतं निराळी, पक्ष निराळे, हे निराळे, ते असू नये. एकमेकांच्या मैत्रीने आणखी

जीणं चांगलं होईल, ही प्रार्थना संतांची आहे.

तेव्हां याप्रमाणे हे संतांचे विचार, या विचारांची संगती या रुपानी आपल्याला निरंतर घडावी. आणि अशाच प्रकारची त्यालाही जी साधना आहे. एकत्र राहून काही काळ का होईना थोडा काळ तरी आणखी त्याच्यासाठी एक सप्ताह म्हणा, दहा दिवस आठ दिवस काय होईल ते. पुन्हा पुन्हा आणखी ते संस्कार आपल्यावर झाले पाहिजेत. वाणीने, शरीराने. मनाने सगळ्या दृष्टीने आणखी संस्कार उत्पन्न झाले म्हणजे त्या संस्कारांनी बुद्धीच संवर्धन होत आहे. बुद्धीचं संवर्धन होत आहे. बुद्धीचं संवर्धन करण्याकरिता हा मानवजन्म आहे. बाकीचं संवर्धन होईल, जाईल. त्याच्याबद्दल काही नाही. पण बुद्धीही चांगली घेऊन जायचंय पुढं सुद्धा आपल्याला म्हणून हे बौद्धीक कार्य जे आहे बुद्धी संवर्धन करणं, बुद्धी सात्विक करणं, बुद्धीचा विकास करणं याकरता संतांनी मुद्दाम लक्ष दिले आहे.

समर्थांचे तर लक्ष आणखी सर्व दृष्टीने इकडे आहे. त्यांनी किती शिकवले आहे, लिहिले आहे ! ते विचार आपल्याला ऐकायला मिळावेत, आपल्या मनामध्ये दृढमूल रहावेत या करता प्रयत्न करायचा आहे. आज समारोपाचा दिवस आहे. समारोप झाला म्हणजे संपले. घरी जाऊन आपलं पुन्हा पहिल्याप्रमाणे रहायचे असा अर्थ नाहीये. ही सात्विक संस्कार बुद्धी सत्वपक्षपाती आहे. ''मना सज्जना भक्तिपंथेची जावे'' मनाला ''सज्जना'' म्हणताहेत समर्थ ! दुर्जन म्हणत नाहीयेत. मूलतः मनाची निर्मिती सात्विकच आहे, उपनिषदामध्ये सांगितल्याप्रमाणे. सत्वगुणाच्या अंशापासून मन झालेले आहे. त्याच्यामध्ये बाकीचे अंश येतात ते दूर करायचे आणि सात्विकता त्याची वाढवायची आहे. या करता अशा प्रकारचे

हे कार्यक्रम या ठिकाणी योजलेले आहेत. हे सद्गुरु सेवा मंदिर तयार झालेले आहे. त्याच्या नंतर बालकांच्या शिक्षणाचेही स्थान आहे. निरनिराळ्या प्रकारची शिबिरेही होत आहेत. त्या पैकी हे एक शिबीर महत्वाचे आहे. बुद्धीचे संवर्धन करण्याकरता म्हणून हे केलेले आहे. आपले समर्थ, राष्ट्रसंत त्यांना म्हणतात. त्यांची आणखी प्रेरणा आपल्याला समजून घ्यायची आहे. इथे जे जे काही सात दिवसांत आपल्याला शिक्षण मिळाले ते घरी चालू ठेवायला हरकत नाहीये. इथं आपलं अगोदर सांगतात अमुक वेळेला अमुक ठिकाणी चला. योगासने होणार आहेत. अमुक प्रार्थना म्हणा. तसं जरी तिथे कोणी सांगायला नसले तरी सात आठ दिवस अशी सवय झाली आहे. त्याप्रमाणे घरी जेवढे चालू असं ठेवता येईल तेवढे चालू ठेवायला हरकत नाही. म्हणजे पुन्हा जर दुसऱ्या वर्षी इथं येता आलं तर जास्ती आपला विकास होईल.

ही अशा प्रकारची कृपा समर्थांच्या आणखी पुण्याईने त्यांची कृपा आपल्यावर व्हावी. त्यांच्या तप: प्रभावाने आपल्या राष्ट्रामध्ये जे काही मनोदौर्बल्य निर्माण झालेले आहे, मोठे मोठे आणखी श्रेष्ठ पुरुष सुद्धा पदाधिकारी असलेले दुर्बल मनाचे झालेले आहेत. मनाचं दौर्बल्य हे सुद्धा कळून येत नाही. आपल्या मनातला दोष आपल्याला कळून न येणे याच्यासारखे दुसरे दुर्दैव कोणते नाही. नाही, आम्ही चुकतच नाही. आम्ही नेहमी बरोबरच वागतो. अशी आणखी दृष्टी उत्पन्न होते. ते सगळे आपले दौर्बल्य दूर झाले पाहिजे. खंबीर बनण्याची शक्ती आपल्या मनामध्ये आली पाहिजे.

काय, कोणी सहाय्य केले होते? समर्थांना सांगायला कोणी होते काय? त्यांना काय राजशासनाची मोटार होती? असे आणखी

कोणत्याही प्रकारचे सहाय्य नसले तरी एक बुद्धीचे सहाय्य आहे. ''बुद्धी दे रघुनायका'' ज्याच्यापासून ती बुद्धी त्यांना मिळालेली आहे. आणि त्या बुद्धीने सर्व राष्ट्रामध्ये त्यांनी चैतन्य त्या वेळेला निर्माण केलेलं आहे. अजूनसुद्धा त्यांच्या वाणीमध्ये आणखी ते सगळं चैतन्य निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे. तेव्हा ईश्वराच्या कृपेने अशा संत महात्म्यांचे विचार आपल्याला ऐकायला मिळाले पाहिजेत. आणि आपलं चित्तं हे निर्मल झालं पाहिजे. शुद्धं झालं पाहिजे. आपल्याला बुद्धी विकास हा भारत राष्ट्राचा खरा विकास आहे. बाकीचे विकास कर्ज काढून करावे लागतात. काही विकास होतात. काही एकदम धरणंच्या धरणं फुटून जातात. सगळी गांवं, शहराच्या शहर वाहून जातात. असं चाललेलं आहे. चालू दे काही हरकत नाही. परंतु बुद्धीचा विकास ज्यांचा झालेला आहे ते राष्ट्र हे कायम आहे. त्याच्याकडे कुणीही वक्रदृष्टीने पाहू शकणार नाही.

तो बुद्धी विकास भगवान् रामचंद्रांनी, समर्थांनी, मारुतीरायांनी करवून घ्यावा. भारत राष्ट्राचे वैभव अनादि आहे. किती काल झालेला आहे ! भारतीय संस्कृती किती काळाची आहे कोणी सांगू शकणार नाही. टिकलेली आहे. टिकणार आहे, अजूनही. टिकवणारी अशा प्रकारची मंडळी वारंवार येत आहेत. त्यांच्या तप: प्रभावाने, त्यांच्या आणखी बुद्धीसामर्थ्याने हे सगळं राष्ट्र आजपर्यंत टिकलेलं आहे तसंच पुढंही टिकावं हा बुद्धिविकास कायम रहावा आणि बुद्धिविकासाने भारताचे महत्व वाढावं एवढी आणखी समर्थांच्या चरणी प्रार्थना आहे.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**

ईश्वरस्वरुप सर्वही संत महात्म्यांनी भगवत्भक्ती योगाचाच संपूर्ण जीवन असेपर्यंत अभ्यास केला. भक्ती केली भगवंताची. पापक्षय झाल्याशिवाय आत्मज्ञान होणार नाही आणि पापक्षय हा भक्तियोगाने होतो, असाही सिद्धांत भागवतकारांनी सांगितला आहे.

केवळ भक्तियोग आहे, कर्मयोग आहे, परंतु जर भगवंताची नुसती भक्ती केली – केवळ भक्ती, तर त्या केवळ भक्तीच्या योगाने सर्वही पापांचा क्षय होतो. दुरित क्षय झाला पाहिजे असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात ना ! अनेक दुरित, अनेक जन्मांची पापं झाली असतात – वैयक्तिक, सामुदायिक. आणि त्यामुळे आपल्याला प्रतिबंध पुष्कळ निर्माण होतात.

ऐहिक असो किंवा पारमार्थिक असो. आपलं कल्याण करुन घ्यावं असं सर्वांना वाटतं. सर्वांचे प्रयत्न चालू आहेत. पण त्याप्रमाणे आपल्या पदरात काही फळ पडत नाही. जीव हा असमर्थ आहे. इच्छेप्रमाणे त्याला फळ प्राप्त करुन घेता येत नाही. सुख पाहिजे आणि दु:ख सगळी जावीत अशी इच्छा आहे. हेच फळ आहे. पण ते आपल्या इच्छेप्रमाणे घडून येत नाही.

कुणीही असो. एक व्यक्ती असो किंवा अनेक व्यक्ती. व्यक्तींचा समुदाय – लोकशाही म्हणतो त्याला आपण. सर्व समुदाय मिळून राज्य करायचे. आणखी चांगलं. सर्वांना सुखी करायचे हे त्यांना सुद्धा शक्यं नाही. ईश्वर पण माझा मानावा लागतो म्हणतात.

सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी एका ठिकाणी हा मुद्दाम उल्लेख केलेला आहे. ईश्वर आहे कशावरुन, म्हणाले, तर तुमच्या इच्छेप्रमाणे तुम्ही आपलं कल्याण करुन घेऊ शकत नाही.

म्हणून ईश्वर मानला पाहिजे. कुणाही व्यक्तीचे सामर्थ्य नाही दिसून येत. काही ना काही आणखी प्रतिबंध उत्पन्न होतात. सुखाला प्रतिबंध आहे. दु:ख निराळे नाही, तर केवळ आपल्या सामर्थ्याने काही हे दूर करता येत नाही.

***वाढील्या उद्वेग दु:खची केवळ ।***
***भोगणे ते फळ संचिताचे ।।***

तुकाराम महाराजांनी सिद्धान्त सांगितलेला आहे. केव्हां जाईल दु:ख, केव्हां जाईल दु:ख? नुसते म्हणून काही उपयोग नाही. जे आपल्या हातून कर्म झालेले आहे त्याचे फळ आपल्याला भोगावे लागते. हा एक मोठा सिद्धान्त आहे आणि तो आपल्याला मान्य करावा लागतो.

आजारी पडलेला आहे. मोठा रोग आहे. आणि औषध देणारा डॉक्टरही मोठा आहे. हजार हजार रुपयांचे इंजेक्शने आणतात. त्या औषधांनी एक रोगी बरा होतो आणि दुसरा बरा होत नाही. दुसऱ्याला तोच रोग झालेला आहे. आणि एका रोग्याला बरा करणारा डॉक्टर दुसऱ्या रोग्यालाही तेच औषध देतो. काय कमी झाले? काय औषध चुकलेले आहे का? का औषध देण्याचे ज्ञान कमी झालेले आहे? काय, कमी काय आहे? तर तिथे हा सिद्धान्त आहे – ''भोगणे ते फळ संचिताचे.''

कर्म मानावं लागतं. पुनर्जन्म मानावा लागतो. एकाला फळ मिळते आणि दुसऱ्याला फळ मिळत नाही. यावरुन काहीतरी प्रतिबंध आहे तो दिसत नाही. पण गुणही येत नाही यावरुन पूर्वीच काहीतरी त्या जीवाचं कर्म आहे असं मानणं भाग पडतं. पण कर्माने फळ मिळतं. कर्मशक्ती ईश्वराने निर्माण करुन ठेवलेली आहे. ईश्वर कशाला पाहिजे?

ज्याने जशी कर्म केली असतील, चांगली कर्म केली सुख मिळेल, पापकर्म केली तर दु:ख मिळेल. चांगली कर्म करावी आणि सुख मिळवावं ईश्वराचा काय संबंध आहे? कर्माने फळ मिळते हे मानावं लागतं आपल्याला. पण कर्माला स्वत:ला फळ देण्याचे काही ज्ञान आहे का? यांनी ऑफिसात वर्षभरात केव्हांही रजा घेतली नाही, रोज वेळच्या वेळेला येऊन आणखी काम केलेलं आहे हे जाणणारा कोणीतरी वरचा अधिकारी लागतो. त्याने कर्तव्यकर्म उत्तम केलेलं आहे. कधीही गैरहजर राहिलेला नाही हे खरं आहे. पण त्याचं हे कर्म जाणणारा जो वरचा अधिकारी तो शिफारस करतो त्यामुळे प्रमोशन मिळू शकते. म्हणजे कर्म तरी मान्य करावं लागलं, त्या फलावरुन.

हा त्यांनी सिद्धान्त सांगितलेला आहे. आम्ही सगळे जीव असमर्थ आहोत याचं कारण सुखदु:ख आमच्या इच्छेवर अवलंबून नाहीये. म्हणून आमचं सामर्थ्य नाहीये.

मीमांसाकारांचं म्हणणं हेच आहे. ईश्वर ईश्वर कशाला म्हणायचं? काही जरुरी नाहीये. आपण चांगलं वागावे चांगलं फळ मिळतं. पण त्या कर्मांना कुठे ज्ञान आहे? अचेतन आहे. क्रियाहीन. त्यांनी चांगलं कर्म केलेलं आहे हे जाणणारा कुणीतरी पाहिजे. म्हणजे तो त्याचं फळ देतो. कोणत्या वेळेला कोणत्या कर्माचं फळ द्यायचं, काय करायचं हे स्वत: आम्हालाही समजत नाही ना ! आम्ही जरी कर्म केली – सत्कर्म किंवा दुष्कर्म केली तरी ते आम्ही विसरुन जातो. आणि विसरुन जरी गेलो नाही तरी आमच्या कर्माचं आत्ता फळ मिळालं पाहिजे. आमच्या इच्छेवर काही अवलंबून नाही. कर्मशक्ती जरी असली तरी त्या कर्मशक्तीला जाणणारा कुणीतरी पाहिजे. अर्थात तो सर्वज्ञ ईश्वर सिद्ध होतो. आपोआप मान्य करावं लागतं.

सर्वांच्याकडून झालेली जी कर्म आहेत त्याचं त्याला ज्ञान आहे. सर्वांचा तो बुद्धिसाक्षी आहे. अंतर्यामी म्हणतात त्याला. सर्वही जीवांच्या अंतर्यामी तो आहे, प्रेरणा करणारा तो आहे. म्हणजे या जीवाकडून होणारी सगळी कर्म त्याला माहिती आहेत. त्या कर्माचं फल केव्हां द्यायचं वगैरे सगळं माहिती आहे. पण अलिप्त आहे. इतक्या अनंत जीवांची कर्म तपासून आणि त्याप्रमाणे त्यांना त्याचं फल व्यवस्थितपणाने पोहोचवणे हे काम काही सोपं नाहीये ! तर हे काम चाललेलं असूनसुद्धा त्याच्याबद्दल काही नाही, कल्पनासुद्धा नाही अशी मोठी शक्ती आहे. ईश्वरशक्ती म्हणतात.

त्या ईश्वरशक्तीचं ज्ञान ज्यांना झालेलं आहे अशा प्रकारचे महात्मे लोक हे ईश्वराच्या भजनामध्ये सबंध आयुष्य घालवतात. इकडे त्यांचं लक्ष नाहीये. संसार जरी असला तरी संसारामध्ये काही आसक्ती नाही. सर्वही विश्व ज्यांनी निर्माण केलेलं आहे, तो विश्वाचा मालक आहे. त्या विश्वापेक्षा एखादं घर, एखादी जमीन माझी म्हणायची म्हणजे काय? सगळंच त्याचं आहे. ही तरी माझी कसं म्हणायची? पण व्यवहारामध्ये मात्र ते माझं, म्हणावं लागतं. नाहीतर कुणीतरी आपलं घेतलं म्हणजे काही म्हणायचं नाही असा त्याचा अर्थ नाही. व्यवहारातलं शिक्षणंही दिलेलं आहे. तर हेही ईश्वरस्वरुप आहे. परमात्मा श्रीहरी त्याची शक्ती त्या महात्म्यांनी जाणलेली आहे.

***महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृऽतिमाश्रिता: ।***
***भजन्ती अनन्यमनस: ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥***

सर्वही पंचमहाभूतांना निर्माण करणारा. विश्व निर्माण करणारा हा आहे. हे ज्ञान त्यांना आहे. म्हणून त्यांना अहंकार काही नाही. आसक्ती नाही आणि जास्तीत जास्त त्या ठिकाणी प्रेम उत्पन्न होत.

ज्ञानपूर्वक भक्ती या ठिकाणी दाखवलेली आहे, भगवंतांनी. सर्वांचा कर्ता आहे. सर्वांना कारण आहे. असा परमेश्वर आहे हे जाणून ते भक्ती करतात. त्यामुळे त्यांची भक्ती कधीही अस्थिर नाही.

ईश्वराकडं लक्ष असणारी मंडळी आहेत. पुष्कळ आहेत. नाही असं नाहीये. पण संकट आली, दु:ख आली म्हणजे देवाची आठवण होते. देवाकडे जायचे. देवाला मागायचे, किंवा काहीतरी आपलं हे करायचं. माझं एवढं काम झालं की मी अमुक सत्यनारायण करीन. अमुक करीन तमुक करीन. त्याला कुठं सत्यनारायण पूजेची आवश्यकता आहे? काहीच नाहीये. अगोदर कुणी करत नाही मात्र ! अगोदर सत्यनारायण करुन माझं काम व्हावं असं म्हणणारे कमी आहेत. बहुतेक नसतीलच मला वाटतं. सर्व झाल्यावर करायचे. ते सुद्धा तो साधुवाणी विसरुन गेला. स्वभाव आहे जीवाचा.

तर हे जे महात्मे, संत आहेत. ईश्वराला पूर्ण त्यांनी ओळखलेलं आहे. आणि त्यांची भक्ती दृढ आहे, तिकडंच आहे.

***अनन्य मनस: मुदित: ।***

अन्य ठिकाणी त्यांचं मन जातच नाही. परमेश्वराचं अखंड स्मरण त्यांचं चाललेलं आहे. आणि तेच देवाजवळ ते मागून असतात.

***तुझा विसर न व्हावा ।***

एवढं द्या म्हणतात. संपूर्ण भागवत सांगून झाल्यावर शेवटी आणखी या भगवंताच्या स्मरण भक्तीचे विवेचन केलेले आहे –

***अविस्मृती: कृष्ण पदारविंदयो: ।***
***क्षिणोती अभद्राणि शमं तनोतिच ।***
***चित्तस्य शुद्धिम् परमात्म भक्तिम् ।***
***ज्ञानं च विज्ञान विरायुक्तम् ॥***

भगवंताची भक्ती केली म्हणजे काय मिळतं? देवाच्या भक्तीचं फल काय आहे? कशाकरता करायचं? आपला उद्योगधंदा कशाला सोडायचा? असे काही काही मनामध्ये विकल्प उत्पन्न होतात. संतांची संगती असली म्हणजे उत्पन्न होत नाहीत. कारण नेहमी ईश्वर स्मरण त्यांना असतं. ते ईश्वराचं चरित्रंच नेहमी सांगत असतात. त्यामुळे ईश्वराबद्दल आपल्या मनामध्ये काहीही विकल्प, सत्संगती असेल तर येत नाहीत.

जे ईश्वरापासून नेहमीच बाजूला आहेत, मी कर्ता आहे, ईश्वरोंअहम्, मीच ईश्वर आहे, मी सगळं करणारा आहे, असा अहंकार ज्यांना उत्पन्न झालेला आहे. म्हणून ईश्वर स्वरुपाची त्यांना बिल्कुल जाणीव नाही. कधीही नाही. त्यांची संगती घडली म्हणजे तिथे तसंच होणार. ईश्वर नाही हेच ऐकायला मिळणार.

तर संतांच्या संगतीमध्ये असतांना आणि ईश्वराचं अखंड स्मरण आपल्याला होते. चरित्र ऐकायला मिळतात. आणि ते दिव्य चरित्र आहे ईश्वराचं, कोणते कोणते अवतार भगवंतांनी घेतले, कोणत्या भक्तांना आणखी संकटातून मुक्त केले, कसा उद्धार केला त्याचा. हे सगळं आपण ऐकल्यानंतर आपल्या मनामध्ये प्रेम उत्पन्न होते. मनामध्ये असलेले पाप, दोष दूर होतात. आणखी त्या मनामध्ये ईश्वराबद्दल प्रेम निर्माण होतं. ते वाढलं पाहिजे.

भगवद्भक्तीसुद्धा सोपी नाहीये. भक्तीमार्ग, फार सोपा आहे असं काही लोक म्हणतात. फार कठीण आहे. कर्ममार्ग तर कठीणंच आहे. ज्ञानमार्ग तर फारच कठीण आहे. योगमार्ग तर त्यापेक्षाही कठीण आहे. भक्तीमार्ग मात्र सुलभ आहे असं म्हणतात. पण नाहीये. भक्ती केव्हा निर्माण होते याबद्दल भगवान सांगताहेत अर्जुनाला –

***येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।***
***ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रता: ॥***

पापक्षय झाला पाहिजे. ज्ञानाप्रमाणे भक्तीच आहे.

***बहुत सुकृताची जोडी.....***

ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत. अनंत जन्म जर सुकृत घडली असली आपल्या हातून तर पापक्षय होतो. आणखी मन आपलं ईश्वराकडेच तन्मय होऊन जातं. प्रेम निर्माण होतं. पुण्यकर्म केली पाहिजेत. आणि त्या पुण्यकर्मांनी पापक्षय होतो. आणि नंतर ''ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते'' हे भक्तीचं स्वरुप आहे. कोणत्याही रीतीने सांसारीक मोह अंत:करणात असून उपयोगी नाही. म्हणजे ती खरी भक्ती आहे. ईश्वराची भक्तीही करायची. इकडं संसारही करायचा. संसारात अनुकूलता जर टिकली तर ईश्वराची भक्ती टिकणार. देवाची आमच्यावर दया आहे. आमचं सगळं कल्याण आहे. आमची संकटं दूर करतोय. आणि झाली नाही तर ! मग ईश्वराचं स्मरण नाही. त्या करता 'अनन्य मनस:' होणं म्हणजे ईश्वराचं स्वरुप, त्याची शक्ती कशी आहे हे समजलं पाहिजे.

त्याकरता असे ज्ञानी महात्मे असतील त्यांची संगती झाली पाहिजे. ते समजावून सांगतात. ईश्वर साक्षात्कार त्यांना झालेला आहे. त्यामुळे ते सांगत आहेत. वाचून नाही नुसतं. त्यामुळे त्यांच्या वाणीमध्येही सामर्थ्य आहे. पटतं आपल्याला. टिकणं हे निराळं आहे. तेच त्यांच्या कृपेने, ईश्वराच्या कृपेने टिकवतील प्रेम. आणि असं जर अखंड स्मरण अंत:करणामध्ये उत्पन्न झाले, निरंतर ईश्वरस्मरणावाचून एक क्षणही जाणार नाही, अखंड स्मरण आहे, तर त्याचं फळ सांगताहेत. ''तुझा विसर न व्हावा'' का मागीतलं

तुकाराम महाराजांनी? ईश्वराचं विस्मरण होऊ नये म्हणजे अखंड स्मरण घडावं.

तर त्याची ही फळे सांगताहेत भागवतकार –

***अविस्मृती: कृष्णपदारविंदयो: ।***
***क्षिणोती अभद्राणि शमं तनोतिच ॥***

पहिलं पद आहे. सगळी अभद्र, अमंगल काहीही होणार नाही. ईश्वराची भक्ती करायला प्रवृत्त जो झालेला आहे, ईश्वराचे अखंड स्मरण ज्याला मिळालेलं आहे त्याची सगळी अभद्र दूर होतात. मंगलमय जीवन होत. आणि ''शमं तनोति च'' तिथे ''शम'' शब्दाचा अर्थ आहे. आचार्य महाराजांनी सांगितलय –

***सदैव वासना त्याग: शम***

मनातल्या मनात वासना कमी कमी होत चालल्या म्हणजे पूर्ण शांती आहे. त्याच्या नंतर तिसरं फळ भगवत् स्मरणाचं म्हणजे ''चित्तस्य शुद्धिम्'' चित्त शुद्धं होण. स्मरण होण्याला अगोदर चित्त शुद्ध झालंच पाहिजे त्याशिवाय स्मरण हे होणार नाही. पर त्या स्मरणानंतर होणारी चित्ताची शुद्धी काही विलक्षण आहे. शुद्ध बुद्धी झालेली आहे. आणि त्या शुद्ध बुद्धीमुळे ईश्वराची जी आज्ञा आहे त्या आज्ञेपासून केव्हांही बाजूला तो होत नाही. नेहमी ईश्वराज्ञापालन करण्याकडे त्याचं लक्ष असतं.

धर्मराजाचं उदाहरण आहे. वनवासामध्ये पांडव असताना धर्मराजाला एक दिवस तहान लागली होती. पाणी प्यावं आणि पाणी घेऊन जावं त्या भांड्यातून, म्हणून त्या तलावाजवळ गेल्याबरोबर पलीकडच्या बाजूला एक धिप्पाड मोठा यक्ष बसला होता. ''भीमा हात लावू नकोस पाण्याला. हा तलाव माझा आहे.'' आता तो भीम

काय ऐकणार ! तो म्हणाला, ''अशी कुठं पाण्यावर सत्ता असते काय? पाणी देवाचे आहे. ईश्वराने निर्माण केलेलं आहे. तुझा तलाव म्हणजे?'' ऐकले नाही. ''बघ म्हणाले. चांगलं होणार नाही.'' पाणी प्यायला तो आणि मरुन पडला.

अर्जुन आला. त्यानेही ऐकले नाही. तो एवढंच म्हणाला. ''मी तुम्हाला विचारतो प्रश्न त्याची उत्तरं द्या आणि नंतर पाणी प्या.'' भीम, अर्जुन, नकुल, सहदेव चारही बंधू, तहान लागलेली, उन्हाळ्याचे दिवस, पाणी प्यायले आणि मरुन पडले. काय झालं? हे आले का नाहीत म्हणून धर्मराज स्वत: तिथं आले. आणि त्या यक्षाने सांगितले ''धर्मराज, हे चारही बंधू तुझे, माझं न ऐकल्यामुळे त्यांना मृत्यु आलेला आहे. माझ्या प्रश्नांची उत्तरं द्या आणि मग पाणी प्या एवढेच मी सांगितले. तू माझ्या प्रश्नांची उत्तरे जर देशील तर तुला पाणी पिण्याची मी आणखी संमती देईन.''


आता केवढी परिस्थिती आहे. चारही बंधू, अतिशय पराक्रमी, ते चारही बंधू मरुन पडलेले आहेत. काय मनाची अवस्था झाली असेल ! बारा वर्षांचा वनवास संपवून आपल्याला जायचंय, आपलं राज्य घ्यायचं आहे जिंकून युद्ध करुन. आता कुणाचं सहाय्य होणार? ती आशा संपली. पण अशाही स्थितीमध्ये त्यांनी सांगितल्याप्रमाणे आणि कबूल केले. विचारा म्हणाले, प्रश्न. त्याची उत्तरे मी देतो.

असंमोह म्हणून दहाव्या अध्यायामध्ये ईश्वराच्या ताब्यात काय काय आहे ते सांगितले आहे. लोकमहेश्वरन् – सर्वांचा तू नियामक आहेस ते स्पष्ट करण्याकरता –

***बुद्धिर्ज्ञानमसंमोह: क्षमा सत्यं दम: शम: ।***
***सुखं दु:खं भवोऽभावो भयं चाभयमेवच ॥***









***अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयश: ।***
***भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधा: ।।***

कुणीही आणखी देऊ शकत नाही. त्यापैकी असंमोह म्हणून जो आहे. कर्तव्यकर्म प्राप्त झालेलं असताना बुद्धी स्थिर राहणं, निर्विकार बुद्धी राहाणं, मन राहाणं हा असंमोह पदार्थ आहे. चारही बंधू मरुन पडले आहेत. तो यक्ष म्हणतो आहे, प्रश्नांची उत्तरे देशील तर पाणी प्यायची संमती मिळेल. नाहीतर तुझीसुद्धा अशीच अवस्था होईल. विचारा म्हणाले. महाभारतामध्ये ते प्रश्न प्रसिद्ध आहेत. आणि इतक्या स्थिर बुद्धीनं तो सगळा शोक दूर करुन आणखी शांत मनाने समर्पक उत्तरं दिल्यामुळे तो यक्षराज प्रसन्न झालेला आहे. ''काही हरकत नाही माझ्या इच्छेप्रमाणे मी विचारले प्रश्न, तू चांगली उत्तरे दिलीस आता तुला वर देतो. मागून घे. या चौघांपैकी कोणता तरी एक भाऊ तुझा जिवंत होईल'' म्हणाले. ''कोणता जिवंत व्हावा?'' त्याने सांगितले, ''नकुलो यक्ष जीवतु. नकुलाला जिवंत करा'' तो हसला. साक्षात यमधर्मच परीक्षा करण्याकरता आलेले आहेत. धर्मराज किती धर्मनिष्ठ आहे. कसा भगवद् भक्त आहे. हे पहाण्याकरता आलेले होते.

ते म्हणाले, ''अरे, नकुल जिवंत होऊ दे? नकुलाचा काय उपयोग? लहान मुलगा तो. भीम किंवा अर्जुन जर जिवंत झाला तर तुला युद्धाला सहाय्य होणार आहे ना ! नकुल जिवंत व्हावा हे का मागितलंस तू?''

तो सांगतो, ''महाराज ! मला दोन माता आहेत. एक माता गेलेली आहे. एक माता सध्या जिवंत आहे. तिचा मी मुलगा आहे. म्हणजे त्या मातेच्या मनाचे समाधान आहे. दुसरी जी माता गेलेली

आहे तिच्याही आत्म्याला समाधान होण्याकरता तिचा मुलगा नकुल जर जिवंत झाला तर तिला समाधान मिळेल.''

'मातृदेवो भव'. माता नाहीये हजर. आत्ता माता हजर असतानासुद्धा आमचं मातापित्यांकडे लक्ष नसतं सध्या. कुठंतरी वृद्धाश्रमात जाऊन रहावं त्यांनी असं वाटतं. तुम्ही त्यांना ठेवून घ्या– आमच्या आईबापांना. पांचशे रुपये नाही हजार रुपये मागितले तरी मी पाठवित जाईन महिन्याला, पण तुमच्या आश्रमात ठेवून घ्या, असं म्हणतात. इथं माता जिवंत नाहीये तरीसुद्धा तिच्या आत्म्याला समाधान होण्याकरता तिचा मुलगा जिवंत व्हावा, पुढचं पुढे पाहता येईल म्हणाले. युद्धाला सहाय्य काय व्हायचे ते ईश्वराच्या ईच्छेने होईल.

म्हणजे ही जी चित्तशुद्धी आहे ही भगवद्‌भक्तीच्या योगाने आहे. मग ते यमधर्म प्रसन्न झाले. त्यांनी चारही भावांना जिवंत केले शेवटी. पण त्याची परीक्षा आहे. धर्मनिष्ठा आहे. भगवंताची आज्ञा जशी आहे त्याप्रमाणे वागायचं. तर ही चित्ताची अशी शुद्धी की ज्या शुद्धीमुळे त्याचं सगळं कार्य झालेलं आहे, धर्मराजाचं. कौरवांनी जी अट घातली होती बारा वर्षे वनवास. पराजय झाला की बारा वर्षे वनवासामध्ये रहायला पाहिजे. आणि त्यापेक्षा भयंकर अट म्हणजे एक वर्ष अज्ञातवासामध्ये पांडवांनी रहायचं आहे आणि अज्ञातवासामध्ये असतांना ते जर उघडकीला आले तर पुन्हा बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास. बुद्धीचं चातुर्य आहे दुर्योधनाचं. पण चांगल्या कामात नाही. पांडवांनी जन्मभर वनवासातच राहावं अशी बुद्धी झालेली आहे. पण त्यातही पांडव अज्ञात राहू शकणार नाहीत त्याला कौरवांनी कबुली दिलेली आहे असे म्हणावे लागेल.

श्रेष्ठ महात्मे त्यांचा कितीही छळ करायचं जरी मनामध्ये आणलं दुर्जनांनी तरी त्यांनासुद्धा मान्य करावं लागतं. पांडव हे अज्ञात राहू शकणार नाहीत. त्यांचे इतके गुण आहेत की ते प्रकट होतील. सहज आपण त्यांना शोधून काढू. पुन्हा बारा वर्षे वनामध्ये आणि वनात गेल्यापासून त्यांच्या पाठीमागे सी.आय.डी. खातं यांचं होतंच. कुठं जातायत, केव्हा जातायत, कुणीकडे हे फिरताहेत, बारा वर्षांनंतर कुठे जाणार आहेत. ते बिचारे वनामध्ये राहणारे, त्यांच्या जवळ काय आहे? कोण आलं? कोण पाहतंय? कशाला येत आहेत? तेव्हां ती जी एक वर्षाची अज्ञातवासाची अट ती जर साध्य झाली नाही, प्रगट जर झाले तर पुन्हा बारा वर्षे वनांत जावे लागेल. तर ती जी अट आहे त्याच्यातून या यमधर्मांनी त्यांना मोकळं केलं. यमधर्मांनी त्यांना सांगितले, धर्मराज तुझी बुद्धी उत्तम आहे. शुद्ध बुद्धी आहे. तुम्ही सगळे पांडव अगदी या रुपामध्ये आपल्या मूळच्या रुपामध्ये जरी फिरलात कुठंही तरी एक वर्ष तुम्हांला कोणीही ओळखणार नाही असा वर दिला.

पुढे ईश्वरप्रसाद संपादन करुन एक वर्ष अज्ञातवासातही ते राहिले. ओळखू शकले नाही. त्या पणातून मोकळे झाले. ही चित्ताची शुद्धी आहे. की ज्या शुद्धीमुळे देवतांचा प्रसाद आपणहून होतो. मागावं लागत नाही. आणखी पराभक्ती. ही पुढं भक्ती पुन्हा निराळी आहे. स्मरणशक्ती अखंड सुरु झाल्यानंतर पदरात पडणारी ही फळं आहेत. वासनाक्षय होतो आहे. चित्तशुद्धी होते आहे. आणि परमात्म भक्ती ही पुन्हा वेगळी आहे. पराभक्ती जिला म्हणतात. की दुसरे काहीही मागायचे नाही. ईश्वरस्वरुपाचा साक्षात्कार झाल्यानंतर जी भक्ती आहे ती पराभक्ती आहे. आणि ही भक्ती अंत:करणामध्ये त्याने निर्माण

होते म्हणतात. वासना कमी कमी होत चालल्या आहेत, चित्त शुद्ध होत चालले आहे. आणखी त्यामुळे भगवंताची भक्ती ही अखंड वाढत जात आहे. आणखी पुन्हा तिकडे सांगताहेत –

***ज्ञानंच विज्ञान विरागयुक्तम् ।***

ज्ञान होतं, विज्ञान होतं आणि वैराग्यही मिळतं.

संपूर्ण वेदाचं सार काय आहे, शास्त्राचं सार काय आहे हे समजून येणं म्हणजे ज्ञान म्हणतात. ''वेद तात्पर्य ज्ञानं'' आणखी त्याचा अनुभव येणं त्याला विज्ञान म्हणतात. श्रीधर स्वामींनी सांगितलंय प्रत्यक्ष आणखी जो ''वेदै: च सर्वै रहमेववेद्य:'' हे वेदांचे सार आहे. त्या परमेश्वर स्वरुपाचा साक्षात्कार होणं, अनुभवणं म्हणजे विज्ञान आहे. आणि ते वाढण्याकरता मोठं होण्याकरता आवश्यक जे वैराग्य आहे. मनामध्ये कोणतीही इच्छा राहिलेली नाही. त्या प्रज्ञावस्थाच आहे.

***प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।***
***आत्मन्येवात्मना तुष्ट: स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥***

सर्व कामवृत्तींचा लोप हा मोक्ष आहे. प्रल्हादजींच्या वरती नरसिंह प्रसन्न झाले आणि ''काही तरी वर मागून घे बाबा'' म्हणाले. तरीसुद्धा काही तरी देवाचा आग्रह पाहून त्याने सांगितले –

***यदि रासीश मे कामान् वरांस्त्वं वरदर्षभ ।***
***कामानां हृद्यसंरोहं भवतस्तु वृणे वरम् ॥***
***इन्द्रियाणि मन: प्राण आत्मा धर्मो धृतिर्मति: ।***
***ह्री श्रीस्तेज: स्मृति: सत्यं यस्य नश्यन्ति जन्मना ॥***
***विमुच्चति यदा कामान् मानवो मनसि स्थितान् ।***
***तर्ह्येव पुण्डरीकाक्ष भगवत्वाय कल्पते ॥***

मला आपण देणार आहात का वर? मागतो म्हणाले. माझ्या मनामध्ये कोणतीही वासना कोणतीही इच्छा राहू नये. शुभ वासनाही नको. अशुभ वासनाही नको. पुन्हा अभिमान उत्पन्न होणार नाही. चांगल्या वासना आहेत माझ्या आणि चांगला आणखी संकल्प आहे. निष्काम अंत:करण व्हावं हे मागणं आहे आणि त्याचं कारण त्यांनी दिलेलं आहे की ज्यावेळी जीवाच्या अंत:करणातल्या, बुद्धीतल्या सगळ्या कामना नाहीशा होतील त्या वेळेला जीवभाव संपलाय तो स्वत: प्रत्यक्ष भगवत्स्वरुप आहे.

***विमुच्चति यदा कामान्मानवो मनसि स्थितान् ।***

तरी प्रल्हादांनी वर्णन केलं आहे. मनामध्ये कोणतीही इच्छा नाही. निष्काम अंत:करण झाल्यानंतर तो जो भक्त आहे मनामध्ये काहीही इच्छा नाही. ''ठेविले अनंते तैसेची रहावे'' ही स्थिती मिळाली. मला अमुक झालं पाहिजे. तमुक काहीही नाही. या अवस्थेपर्यंत जाऊन पोचलेला जो जीव आहे त्याचा जीवभाव संपला. तो साक्षात् भगवान झालेला, ईश्वररुप झालेला आहे. म्हणजे ईश्वरस्वरुपाची जाणीव प्रल्हादजींना आहे.

ईश्वर म्हणजे काहीही इच्छा नसणारा तो ईश्वर आहे. आणि इच्छा करणारा म्हणजे जीव आहे. त्या इच्छा करतो कर्म करतो, पुन्हा त्याचं फल भोगण्याकरता पुन्हा जन्म मृत्यु वगैरे सगळ्यात सापडतो. तर हे वैराग्य आहे. काही नाही. अनन्य मनस: । अन्य ठिकाणी त्यांचं मन जातच नाही. अनंत स्वरुप जो परमात्मा त्याचं अखंड स्मरण असल्यामुळे दुसरीकडे त्याचं चित्त जाऊच शकत नाही ही अशी फलं संसारामध्ये मिळणे शक्य आहे का? मनातल्या वासना कमी होणे, विषयाकडे मन न जाणे, शुद्ध अंत:करण होणं हे

जे आपल्याला पाहिजे असं सुद्धा वाटणार नाही. मग प्रयत्न तरी कसा होणार? आणि मिळणार तरी कसे?

तर ही सगळी फलं जी आहेत, दुर्लभ असलेली ती ईश्वराच्या नित्य स्मरणाने प्राप्त होतात असा आणखी सिद्धांत सांगितलाय. म्हणून तुकाराम महाराजांनी

***हेची दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥***

ईश्वराचं विस्मरण कधीही होऊ नये हे ईश्वराजवळंच मागितलेले आहे. जीवाला शक्यं नाही ते प्रयत्नांनी. केव्हा मन दुसरीकडे जाईल आणि विस्मरण होईल याचा नेम नाही. दुसरा एक अभंग आहे तुकाराम महाराजांचा –

***पहा ते पांडव अखंड वनवासी ।***
***परि त्या देवासी आठविती ॥***
***प्रल्हादासी पिता करीतो जाचणी ।***
***परि तो स्मरे मनी नारायण ।***
***सुदामा ब्राह्मण दरिद्रे पीडीला ।***
***नाही विसरला पांडुरंगा ॥***

इतकी उदाहरणे दिली आहेत. आणि शेवटी सांगताहेत –

***तुका म्हणे देवा तुझा***
***न पडावा विसर ।***
***दु:खाचे डोंगर झाले तरी ।***

दु:ख झाल्यानंतर मनुष्याचं लक्ष कसं जाईल? पण ते देवाजवळंच त्यांनी मागितले. विस्मरण होऊ नये देवाचे म्हणजे सुखाच्या अवस्थेतही होऊ नये हेही मागितले पाहिजे. सगळी प्रपंचातली परिस्थिती चांगली आहे, संपत्ती आहे, सत्ता आहे, कीर्ती आहे, सगळं

आहे. अशा वेळेला स्मरण होणं कठीण आहे. सगळं अनुकूल आहे ना ! मग कुठून देवाची आठवण होणार वर जास्ती अभिमान मी कसा सुखी आहे. माझ्यासारखा कोण जास्ती सुखी आहे? अभिमान वाढत गेल्याने ईश्वराचे स्मरण होत नाही. त्या वेळेलाही होत नाही. आणि दु:खाच्या वेळेला, दु:ख असह्य झालं, सहन होत नाही त्यावेळेला कुठली आठवण येणार? पण दु:ख जरी पुष्कळ आली तरी मला आठवण पाहिजे हे त्यांनी मुद्दाम मागितलंय.

पांडवांचं उदाहरण दिलेले आहे. वनवासात आहेत पांडव. राज्य सोडून गेलेले आहेत. वनवास कधी माहीत नाही यांना. साम्राज्य मिळवलेले पांडवांनी. सम्राट राजा. राजसूय यज्ञ केला. आणि लगेच इकडे वनवासात जावं लागलं. पण वनवासात असतानासुद्धा ''देवासी आठविती'' म्हणतात. तो एक आदर्श त्यांनी पुढे ठेवला. तुकाराम महाराजांनी. वनवासात असतानासुद्धा ते देवांना विसरले नाहीत. दुसरं प्रल्हादजींचं उदाहरण देताहेत. पित्याने किती त्रास दिला म्हणाले. प्रत्यक्ष मुलाचा प्राण घेण्यासाठी पिताच प्रयत्न करतोय. दुसरं कोणाकडे जायचं त्या बालकाने, पाच वर्षांच्या मुलाने. पण काही तक्रार नाही. ईश्वराजवळ काहीही मागणार नाही. त्याने जर मागितलं असतं तर लगेच हिरण्यकश्यपू राहीला असता का तिथे ! उलट हिरण्यकश्यपूचा नाश झाल्यानंतर प्रल्हादजींनी प्रार्थना केली आहे, की देवा, माझा पिता अज्ञानी होता. शत्रू नाही तो. अज्ञानाने त्याने आपले अपराध केले, आपला द्वेष केला. त्याचा उद्धार आपण करा. एवढी प्रार्थना त्यांनी केली. त्यावेळी देवांनी सांगितले, नरसिंहानी, ''बाबा, तुझ्या एकट्या पित्याचा उद्धार झाला असं नाही, एकवीस पिढ्यांमध्ये याच्या पूर्वी होऊन गेलेले तुझे सगळे

पूर्वज, त्या सगळ्या पूर्वजांचा उद्धार झालेला आहे.'' त्याचं कारण ते सांगताहेत, ''तुझ्यासारखा भक्त मोठा ज्या कुळामध्ये जन्माला आलेला आहे त्या सगळ्या कुळामध्ये उत्पन्न झालेल्या एकवीस पिढ्या उद्धरुन गेलेल्या आहेत'' म्हणजे त्यालाच मोठेपणा दिला.

तर असा हा प्रल्हाद. त्याचा एक आदर्श तुकाराम महाराजांनी आपल्या समोर ठेवलेला आहे. इतका त्रास देणारा हिरण्यकश्यपू पिता प्रत्यक्ष ''परि तो स्मरे नारायण'' अखंड नारायणाचं स्मरण आहे. त्यामुळे ही दु:खं सगळी बाजूला झाली. ज्ञान आपोआपच उत्पन्न झालेलं आहे.

***नैनं छिदन्ति शस्त्राणि***
***नैनं दहति पावक: ।***

शस्त्रास्त्राचे आघात अंगावर पडताहेत. आत्मस्वरुपाला त्याच्या काही वेदना नाही, दु:ख नाही. त्याचा नाश होणं शक्य नाही. हे दृढ ज्ञान पक्कं झालेलं आहे. त्यामुळे आणखी काही चित्तावर परिणाम नाही. अखंड नारायणाच्या स्मरणामध्ये आणखी प्रल्हादजी राहिले.

तिसरे उदाहरण त्यांनी दिलंय –

***सुदामा ब्राह्मण दरिद्रे पीडीला***
***नाही विसरला पांडुरंगा ॥***

घरामध्ये काही नाही. लाकूड नाही. रामकृष्ण शिकायला होते त्यांच्या मागूनच सुदामजी होते. गुरुमहाराजांच्या आश्रमात सगळी विद्या संपादन करुन आलेले आहेत. ज्ञान उत्तम आहे आणि भगवद् भक्तीही उत्तम आहे. तर हे ज्ञान असले तरी सुद्धा प्रारब्धभोग निराळे आहेत. ते ज्ञान नुसतं देण्याकरता आहे. सर्वांना ज्ञान द्यायचे, पैसा नाही. पूर्वकर्मामुळे घरामध्ये अठरा विश्व दारिद्रय आहे. काही खायला नाही.

पण याचं अखंड स्मरण चाललेलं आहे. हे तिसरे उदाहरण मुद्दाम दिलंय, त्यांनी. देवांनी सगळी संपत्ती दिली म्हणतात. ह्यांनी मागितली नाही. सुदामजी भेटायला गेले बायकोच्या आग्रहामुळे. श्रीकृष्णाचं दर्शन होईल म्हणाले. बरं झालं. पुष्कळ दिवसांनी दर्शन होतंय. परत यायला निघाले. त्यांनीही काही दिले नाही. यांनीही काही मागितले नाही. तरीसुद्धा यांची वृत्ती अशीच आहे. बरं झालं देवांनी मला काही दिलं नाही. देवाची खरी कृपा माझ्यावर आहे. या दरिद्री ब्राह्मणाला जर मी संपत्ती दिली असती तर त्या संपत्तीमध्येच याचं मन गुंतून राहिले असते, मला विसरला असता, जरी देवाला वाटलं म्हणून मला संपत्ती दिली नाही. हेच विचार शेवटपर्यंत अंत:करणामध्ये ठेवले. संपत्ती मिळाली तरीसुद्धा देवाला विसरले नाहीत. आणि दारिद्र्य असतानासुद्धा देवाला विसरले नाहीत. ही इतकी दु:ख असताना हे सगळे म्हणाले, अखंड स्मरणामध्ये राहू दे आणि आपलं अंत:करण ह्यांनी शांत ठेवलेलं आहे. ईश्वराने त्यांना शांती दिली म्हणून देवाला म्हणताहेत. दु:खाचे डोंगर झाले तरी विसर न व्हावा. आपलं विस्मरण मला होऊ नये.

स्वत: आणखी त्याप्रमाणे संतांनी हा अनुभव घेतला आणि सर्वही लोकांना त्यांनी सांगितलेलं आहे. भगवंताचे अखंड स्मरण राहिले पाहिजे. अनुकूल स्थितीमध्ये, प्रतिकूल स्थितीमध्ये ते स्मरण राहिले आणि पारमार्थिक दृष्टीने आपली उन्नती होणं शक्य आहे. म्हणून भागवतामध्ये सांगितलेला हा सिद्धांत आहे की भगवंताचे अखंड स्मरण व्हावं. त्याकरता भागवत आहे. भागवत म्हणजे भगवंताची लीला आहे. काय शक्ती आहे ईश्वराची, कसा मोठ्या मोठ्या लोकांचा, भक्तांचा उद्धार भगवंतांनी केलेला आहे. हे सगळं,

ही ईश्वराची लीला भागवतामध्ये सांगितलेली आहे. आणि त्याच्या योगाने अखंड स्मरण अंत:करणामध्ये त्या सगळ्या लीलांचं स्मरण करायचं. स्मरणभक्ती फार मोठी आहे ना ! ईश्वराची अनंत नांव आहेत. सहस्त्रनाम आपण म्हणतो पण किती तरी नांव आहेत. अनंत रुप आहेत त्याची. प्रत्येकाचं स्मरण करायचं म्हटला तर चौवीस तास पुरणार नाहीत. पण इकडचे सगळे विसरले पाहिजे. इकडचं लक्ष जर कमी झालं, अनन्य मनस: जर होता आलं तर त्या अखंड नामाचं काय? रुपाचं काय? कर्महीं अनंत आहेत.

***जन्मकर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वत: ।***
***त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोर्जुन ॥***

भगवान सांगताहेत. माझे जन्म. माझी कर्म. माझी एकंदर रुपं ह्यांचं जो ज्ञान करुन घेतो त्याचा हा देह पडल्यानंतर पुन्हा त्याला देह घ्यावा लागत नाही. पुनर्जन्म त्याला नाही.

म्हणून अखंड स्मरण करणारे संत महात्मे त्यांच्याच कृपेने आपल्या भारतवर्षाचं आणखी हे जे सौभाग्य आपण पाहतो आहोत. ज्ञानेश्वरी सांगणारी महाराजांसारखी मंडळी आजही आपल्याला भेटतात. ऐकणारी आपल्यासारखी मंडळी आहेत. आवडीनं आणखी हरिनाम घ्यावं म्हणतात. त्याप्रमाणे आवड निर्माण झालेली असते. ती टिकावी एवढं देवाजवळ मागायचं आहे.

आणि ते अखंड स्मरण आपल्याला घडलं तर त्याची सगळी जबाबदारी ईश्वरावर आहे. जीवाला तो कर्मावरती सोपवून देणार नाही. त्याची शक्ती इतकी आहे. प्रारब्ध कर्माचं फळ भोगलं पाहिजे. ''भोगणे ते फळ संचिताचे'' हे सगळं खरं आहे. परंतु ज्यांनी आपलं मन काढून घेतलेलं आहे त्याचं संरक्षण करण्याची जबाबदारी

**न मे भक्तः प्रणश्यति ।**

असं त्यांनीच सांगून ठेवलेलं आहे.

सांदीपनी गुरुमहाराजांच्याजवळ सर्व विद्याभ्यास झाला. गोपालकृष्ण. राम. सुदामजी सगळ्यांचा अभ्यास संपला. आणि नंतर प्रार्थना केली. महाराज काय आणि सगळ्या विद्या आम्हांला दिल्यात. काही तरी आपली सेवा घडली पाहिजे. गुरु दक्षिणा काय द्यायची? त्यावेळेला अशी पद्धत होती. सगळा विद्याभ्यास झाल्यावर मग गुरुदक्षिणेचा विचार. अगोदर डोनेशन द्यावं लागतं तसं नाही. अगोदर इतके पैसे आणा मग प्रवेश. प्रवेशानंतर पुढचा खर्च निराळाच आहे. गोपालकृष्णांनी विनंती केली. गुरुमहाराज काय द्यावं आपल्याला? आता ते जाणते होते. हे काही सामान्य शिष्य नाहीत. प्रत्यक्ष परमेश्वर आहे. बायकोला विचारले काय मागायचे? ती म्हणाली आपला एकुलता एक मुलगा समुद्रात बुडून गेलेला आहे. तोच आणून द्यायला सांगा. असा मुलगा गेलेला आहे. पुन्हा आणून द्या.

लगेच रामकृष्ण हे यमलोकात गेले. आपला दिव्य पांचजन्य शंख वाजल्यावर लगेच यमधर्म आले. यमधर्मांनी नमस्कार केला. काय आज्ञा आहे महाराज ! ते म्हणाले, आमच्या गुरुजींचा मुलगा इथे आलेला आहे. तो आम्हांला न्यायचा आहे. प्रारब्धकर्म वगैरे काही नाही. स्पेशल केस आहे. प्रारब्ध वगैरे नंतर पाहता येईल. आणून दिला यमधर्मांनी. घेऊन आले ते गुरुमहाराजांना दिला.

**एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा**
**हरिकृपे त्याचा नाश आहे ।**

हरिकृपा ज्यांना मिळवता आली त्यांना प्रारब्धसुद्धा नाहीये असा सिद्धान्त आहे असं नाथमहाराज सांगतात. अशी फार मोठी शक्ती

आहे.

आपण सगळीही मंडळी प्रारब्धाधीन आहेत. त्यापैकी चांगलं प्रारब्ध शिल्लक रहावं आणि वाईट प्रारब्ध जावं याकरता ईश्वराची प्रार्थना केली पाहिजे. म्हणून वैकुंठलोकात राहणारे जयविजय यांना या जन्मामध्ये हिरण्यकश्यपू, हिरण्याक्ष, रावण, कुंभकर्ण व्हावं लागलं. देवाची भक्ती करणारे असतानासुद्धा अशा प्रकारचे प्रारब्ध त्यांचं की भक्त देवाचे असताना देवाचे वैरी झाले. तीन जन्म वैर करावं लागलं. हे केवढं शासन आहे ! म्हणून आमचं दूरीत जावं, वाईट प्रारब्ध जावं, चांगल राहू दे. त्या वेळेलासुद्धा आम्हाला अखंड स्मरण ईश्वराचं व्हावं असं देवाजवळ मागायचं आहे. आमच्या प्रयत्नांनी काही हे होणार नाही. भक्ती किंवा स्मरण हे जे आहे ते प्रयत्नांनी काही होत नाही. ईश्वरस्वरुप संत महात्म्यांची कृपा, ईश्वराच्या कृपेने हे सर्व मिळते म्हणून देवाजवळ हे मागितलेलं आहे, संतांनी तसाच उपदेश सर्वांना केलेला आहे. आणि त्या उपदेशाप्रमाणे भारतवर्षामध्ये अद्यापि ईश्वरनिष्ठा कायम आहे. अन्य देशामध्ये अर्थ आणि काम याशिवाय दुसरं काही माहित नाही. पण या देशामध्ये धर्म आहे आणि मोक्ष आहे. हाही विचार आहे. तेव्हां आपल्याला आणखी या जन्मातून आपला उद्धार करुन घ्यायचा आहे. मानवजन्म काय आहे याचं महत्व आपल्याला कळून येतं. आणि त्या संतांच्या उपदेशाप्रमाणे वागून स्वत:चा उद्धारही करुन घेता येतो.

तर अशी संतांची कृपा आपल्यावर व्हावी. भगवंतांनी तेवढी कृपा करावी. ''संत संग देगा देवा'' हे मुद्दाम मागितलेले आहे. पण संत संगही पाहिजे म्हणाले. त्या शिवाय हे मिळाले तरी टिकायचे नाही. केव्हा चित्त बाजूला होईल. मोहामध्ये पडेल काही नेम नाही.

म्हणून तीही संगती आपल्याला अखंड व्हावी. हे मागून घेतलेले आहे. आणि त्या सत्संगतीचे हे महत्व आहे. ईश्वरकृपेने जे होणार आहे ते सगळंही त्यांच्या कृपेने होतंय कारण ते साक्षात ईश्वररुप झालेले असतात. म्हणून ही भारतावरती जी देवाची, ईश्वराची कृपा आहे, ईश्वरस्वरुप संत महात्म्यांची कृपा आहे ती अशीच अखंड रहावी. संसारामध्ये जरी आपण राहिलो तरी सुद्धा ईश्वराचं स्मरण आपलं जावू नये, एवढी कृपा ईश्वराने आपल्यावर करावी म्हणजे भारताचे पूर्ण कल्याण आहे. मानव जन्माचं पूर्ण आणखी सार्थक होणार आहे. तशी कृपा आणखी भगवंतांनी, पांडुरंगांनी करावी अशी आणखी शेवटी प्रार्थना आहे.

**पुंडलिक वर दे हरी विठ्ठल ।**

**॥ श्री गुरुदेव दत्त ॥**

## ॥ पारायणशुद्धी ॥

### प. पू. दत्तमहाराज यांचे प्रवचन - वासुदेव निवास - २०.११-१९८४

भगवान गोपालकृष्णांनी अर्जुनाला भगवद्गीतेचा उपदेश केला. अर्जुनाचं मोठं भाग्य आहे. पदभ्रष्ट होण्याची पाळी आली होती, मिळविलेली कीर्ती सगळी जाण्याची पाळी आली, पण मनामध्ये जो काही विचार उत्पन्न झाला की आपण युद्ध करु नये, निवृत्त व्हावं, ऐन वेळेला त्याला मोह उत्पन्न झाला. त्याला मोह असं नांव दिलेलं आहे. सर्वही एकंदर जीवांना असे प्रसंग येतात हे जाणून भगवद्गीतेचा उपदेश आहे.

काही विकार मनामध्ये उत्पन्न होतात. देहाच्या ठिकाणी अहंभाव आणि देहसंबंधी एवढे पदार्थ आहेत चेतन अचेतन, ते माझे आहेत. हा मोह उत्पन्न झाला. भीष्मद्रोण आपले गुरु आहेत. दुर्योधनादिक आपले बंधू आहेत. यांना आणखी माझ्या हातून मारायची पाळी येऊ नये असं त्याला वाटलं. हा एक मोठा प्रसंग आहे. श्रीकृष्ण परमात्म्यांनी त्याला जो उपदेश केला तो उपदेश म्हणजे ''मला काही कळत नाही, माझी बुद्धी काम करत नाही, माझ्या बुद्धीमध्ये जो मोह उत्पन्न झालेला आहे त्यामुळे मला धर्म अधर्म काही कळत नाही, माझ्या कल्याणाचा मार्ग आपण मला दाखवा. मी आपला शिष्य व्हायला तयार आहे'' असं कबूल केल्यानंतर केलेला आहे.

अर्जुनांनी आपल्या बुद्धीचा आग्रह सोडून दिला. मला सर्व समजते आहे, मी जो निर्णय घेतलेला आहे तो बरोबर आहे,

धर्मशास्त्राला अनुसरुन आहे अशा समजूतीनं आत्तापर्यंत तो बोलत होता. अहंकार, त्या अहंकारानी बुद्धीला सगळं समजतं. बुद्धीच्या पलीकडं काही एक शक्ती आहे, बुद्धीलाही प्रेरणा करणारी एक शक्ती आहे ही जाणीव त्याला अद्यापि नव्हती. जन्मभर कृष्णप्रेम आहे. भक्ती आहे, ईश्वरभजन आहे, उपासना आहे, सदाचार आहे, वडील माणसांची सेवा ऐकून रहाणं हे सगळं आहे. ***पण ते प्रारब्ध आहे*** आणि हे माझे लोक आहेत. मी काही युद्ध करणार नाही. तरीसुद्धा मला तुम्ही मार्गदर्शन करायला पाहिजे हा विश्वास मनामध्ये उत्पन्न झाला. अज्ञान मला आहे. हे कबूल केलं आणि नंतर भगवंतांनी त्यांना मार्गदर्शन केलं त्यामुळे त्याला भगवद्‌गीतेचा उपदेश पटला. युद्धं मला करायचं नाही काही नाही. तर श्रीकृष्णांनी त्याला अनेक प्रकारांनी सांगितलं. ***कोणीही मनुष्य पूर्ण निवृत्त होऊ शकत नाही. हाही एक सिद्धांत सांगितलाय.*** कांहीही करायचं नाही, असं शक्यंच नाही म्हणाले. शरीर आहे, वाणी आहे, मन आहे, इंद्रिय आहे. याचं कार्य हे चालू आहे, म्हणाले. प्रकृती म्हणून जी आहे ईश्वराची शक्ती त्रिगुणात्मक मायाशक्ती, ही इतकी विलक्षण आहे की त्या शक्तीच्या द्वारानी हे कार्य अखंड चालू आहे. त्यामुळे कोणीही निवृत्त होऊ शकत नाही. सर्व एकंदर सोडून द्यावं आणि स्वस्थ रहावं हे शक्य नाही.

आणखी शेवटी गीतेच्या 'ईश्वर सर्वभूतानां' --- हा शेवटी उपदेश केलेला आहे. शरणागती आहे. ईश्वराला जो शरण जाणारा म्हणजे स्वत:चा अहंकार सोडून जे बुद्धीवाद, मला बुद्धीवादाच्या

पुढं जायला पाहिजे. बुद्धी कार्य करणारी आहे. बुद्धीनं निश्चय केल्याशिवाय कोणचंही कार्य होत नाही. पण बुद्धीमध्ये जो निश्चय व्हायचा तो निश्चय त्या बुद्धीला करता येत नाही. प्रेरक शक्ती आहे, बुद्धीला प्रेरणा करणारी. अंतर्यामी ज्याला म्हणतात त्या ईश्वराकडून बुद्धीला प्रेरणा होते, निश्चय होतो आणि प्रत्यक्ष कार्य सर्व शरीर, इंद्रिय यांच्याकडून कार्य होतं. आता ते कार्य मनुष्य जन्म प्राप्त झाल्यानंतर शास्त्राची आज्ञा मान्य केली पाहिजे. शास्त्र म्हणजे परमेश्वराची आज्ञा आहे. एक ताप नेला. बरं वाटलं पुन्हा दुसरा सुरु झाला. सारखं सुरु आहे. ***दुःख संपली असं कधीच होत नाहीये. त्याचं कारण 'देही अहंता' हे पहिलं कारण आहे. देह म्हणजे मी आहे. देहाला टिकवलं पाहिजे. देहाला बरं वाटण्याकरता औषध घेतलं पाहिजे. खाणं, पिण पाहिजे. त्याच्याकरता द्रव्य पाहिजे. त्याकरता सगळ्या सुखसोयी पाहिजेत. हा एक दोष आहे. 'ग्रहात्मज स्त्रीममता न सोडवे ।' ममता आहे. घर, दार, स्त्री, पुत्र, आप्त, इष्ट हे सगळे माझे आहेत. ही ममता, अहंता आणि ममता हे दोन दोष हे सगळे दोष आहेत. यामुळे 'त्रिताप दावानल पोळितो मला । दत्ता कृपासावली दे ।' ही प्रार्थना आहे अखंड. ही प्रार्थना जर तळमळीनं सुरु झाली तर ईश्वर काही दूर नाहीये.***

***अंतर्यामीच तो आहे. बुद्धीला प्रेरणा करणारी त्याची शक्ती आहे. सर्वव्यापक आहे. त्याला कालमर्यादा नाही. वेषमर्यादा नाही. सर्व ठिकाणी आहे. त्यामुळे त्याला कळलं नाही. अर्ज***

***आमचा दाखल व्हायचाय ही काळजी करायचं कारण नाही. पण तितकी आपली बुद्धी तटस्थ झाली पाहिजे.*** ईश्वरभजन अखंड होईल.

***आपल्या मनाचं परीक्षण आपणंच करायचं. कोणचे दोष आड येतायत ते दोष दूर करण्याबद्दल प्रार्थना करायची.*** मनाचं सर्वही आणखी नेतृत्व त्याच्याकडं आहे, इंद्रिय, मन वगैरे हे सर्वही आणखी सुस्थितीत ठेवण्याची शक्ती त्याच्याकडे मागायची. केवळ दया आहे, सामर्थ्यही आहे. ***या करता निरंतर ईश्वर प्रार्थना करायची आहे.*** तुका म्हणे

***घालू तयावरी भार । वाहू हा संसार देवापायी ॥***

***तव पदी अर्पू असार । संसारा हित हा भार ।***

ही  प्रार्थना आहे. करुणात्रिपदी सुद्धा केवढं विलक्षण कार्य आहे. शांतपणानी जर म्हणायला लागलं तर सगळं आणखी प्रेमाश्रु उत्पन्न होतात. काय प्रार्थना महाराजांची आहे. काहीही करायचं नाही.

***आम्हा अघलेश न बाधो ॥ वासुदेव प्रार्थित दत्ता***

ही प्रार्थना आहे. अघलेश सुद्धा आमच्याकडे येऊ नये ही शक्ती आमची कुठं आहे. पूर्ण प्रेमानी, श्रद्धेनं आणखी परमेश्वराची प्रार्थना करीत राहू. ***स्वत:चा अभिमान, कर्तृत्वाभिमान जितका जितका कमी कमी होत जाईल तितका आपला कर्मयोग जास्ती जास्ती शुद्ध असा होतो आहे. त्याचंच पर्यवसान भक्तीमध्ये होतं आहे. पूर्ण भक्ती उत्पन्न होती. त्या भक्तीनं ज्ञानलाभ झाला म्हणजे जन्म मरण हे संपून जातंय. काही नाही, सुख नाही दु:ख नाही.***

*आनंद आहे.*

तेव्हां अशा रीतीनं महाराजांच्या ग्रंथाचं चिंतन हे पारायण झालं. पुनः पुन्हा वारंवार चिंतन करणं, पारायण करणं आणि या श्रद्धेनं विश्वासानी हे सगळं चालू ठेवलं म्हणजे होतंय सगळं आपलं कल्याण. सद्‌बुद्धी ईश्वरकृपेनं आपल्याला मिळालेली आहे. त्याप्रमाणे ही सेवा आपल्याकडून चालू आहे. सर्वांनी मिळून अखंड अशी सेवा करवून घ्यावी महाराजांनी. आणि आपलं कल्याण करावं एवढीच प्रार्थना करुन आणखी ही वाङ्मयसेवा संपवतो.

**॥ श्री गुरुदेव दत्त ॥**

# शास्त्राज्ञा पालनाचे महत्त्व

***सर्वही मानवांच्या कल्याणाकरता शास्त्र निर्माण केलं परमेश्वरांनी.*** मनुष्य अधिकारी आहे त्यातला. त्यांनी जर शास्त्र म्हणजे ईश्वराची आज्ञा पालन केली नाही तर त्याला काय शासन होईल सांगता येत नाही. ईश्वराची आज्ञा मान्य करायची किंवा मान्य करायची नाही. दोन आहेत मार्ग. ईश्वरच मान्य नसेल तर कुठली ईश्वराची आज्ञा. म्हणूनही आणखी ईश्वराज्ञेचं उल्लंघन होतं. पण ईश्वरशक्ती आहे जर बुद्धीला पटलेलं असेल. पूर्वसुकृत त्याला कारण आहे म्हणतात. पूर्वी काही पापंही घडलेली आहेत, पुण्यही घडलेली आहेत. सगळं पापच घडलेलं आहे असं नाही. आणखी त्या पुण्यामुळे जर बुद्धीमध्ये असे संस्कार असतील आणि त्या संस्काराप्रमाणे ईश्वराबद्दल श्रद्धा, सद्गुरुंच्याबद्दल विश्वास, त्यांचं आज्ञापालन केलं तर आपलं कल्याण होईल हा जर निश्चय असेल बुद्धीचा, तर त्याप्रमाणे आज्ञापालन करुन आपलं कल्याण मनुष्यजन्म मिळाल्याप्रमाणे करुन घेता येतं. ***मनुष्यजन्मामध्येच कल्याण करण्याचं सामर्थ्य आहे.***

देव झाले तरीसुद्धा जीवच आहे. पण त्यांना पुण्यामुळे इतकी आणखी सुखं मिळालेली आहेत की त्या सुखामध्ये निरंतर त्याची बुद्धी आहे. ईश्वर वगैरे कुणीकडेही त्यांची बुद्धी जाऊ शकत नाही. भक्ती, ज्ञान या विषयांकडं त्याचं लक्ष नाही कर्माचा तर तिथं अधिकारच नाही त्यांना.

***मनुष्याला सुख दु:ख भोगावी लागतात आणि काहीतरी***

***विवेक, विचार मनामध्ये उत्पन्न होतो की आपल्या बुद्धीनं आपण निर्णय करुन आपल्या इच्छेप्रमाणे घडून का आलं नाही? कां येत नाही? असा एक विचार उत्पन्न होतो. प्रतिकूल आणखी घटना घडल्यानंतर आपल्या बुद्धीचा, आपल्या प्रयत्नाचा काही उपयोग नाही असं वाटतं. परंतु कुणाची बुद्धी अहंभाव धारण करुन आणि पुन्हा माझंच कार्य आहे, मी सगळं करु शकतो असें समजतो.***

हिरण्यकश्यपूलासुद्धा शेवटी एकदा थोडासा विचार मनामध्ये आला होता. प्रल्हादाला मारण्याचा त्यांनी प्रयत्न केला पण कोणच्याही शस्त्रांनी त्याला मृत्यु येत नाही हे त्यांनी पाहिलं. त्यामुळे त्याच्या बुद्धीवर एक परिणाम झाला, मीच ईश्वर आहे असं समजणारा हिरण्यकश्यपू माझ्यापेक्षाही मोठी शक्ती आहे, माझ्या बुद्धीच्या पलीकडं काहीतरी असावं. नाहीतर मी इतका पक्का निश्चय करुन गेलेला याला मारायचं म्हणतो. हा मरेल असं वाटलं पण ते टिकलं नाही. बुद्धीमध्ये आणखी असे विचार येतात. तेव्हां त्याच्या लोकांनी सांगितलं तुमची एवढी शक्ती आहे. त्याच्या गुरुंनी सांगितलं ''दैत्यांचे, तुम्ही एवढे त्रैलोक्याचे राजे तुम्हांला घाबरायचं कारण काय आहे?'' माझ्यापेक्षा मोठी शक्ती आहे याची जाणीव झाली होती पण ती टिकली नाही.

***तेव्हां पूर्वसुकृतानुसार मनामध्ये आणखी सद्भावना, सद्वासना निर्माण होणं आणि त्या सद्वासनेप्रमाणे कार्य घडून येणं, त्याच्यामध्ये कोणचीही विघ्नं न येणं हे काहीतरी वेगळं***

*कार्य आहे. केवळ बुद्धीवादाला आणखी याचं उत्तर सापडत नाहीये. म्हणून 'बुद्धी कर्मानुसारिणी' असा एक सिद्धांत आहे. जशी कर्म केली असतील त्याप्रमाणे बुद्धी होते.*

परंतु भगवंतांनी अर्जुनाला सांगितलेलं आहे – मी देतो म्हणाले बुद्धी. माझ्याजवळ येऊन पोचतात, ते भक्त. अशी बुद्धी त्या भक्ताला मी देतो. आपण दिलेली बुद्धी आणि त्याप्रमाणे कार्य घडून येणं ही सगळी जबाबदारी देवानी घेतलेली आहे. *तेव्हां देवाने दिलेली बुद्धी आणि आपल्या कर्माप्रमाणे प्राप्त होणारी बुद्धी यामध्ये अंतर आहे.*

*सगुण असो, निर्गुण असो कोणच्याही स्वरुपाचं ध्यान अखंड झालं पाहिजे. ते होण्याकरता आणखी वाणीचं तप आहे. नामस्मरण हे आणखी मुद्दाम सांगितलेलं आहे. नामामध्ये आणखी मन स्थिर होणं, नामानंतर रुपाच्या ठिकाणी स्थिर होणं आणि ते स्थिर झालेलं मन हे विषयापासून आपोआप बाजूला होतं आणि त्या अखंड परमात्मस्वरुपाच्या ठिकाणी राहतं आहे. तो आनंद आणखी त्याला मिळायला लागला म्हणजे हा लौकिक आनंद किती खोटा आहे, किती नश्वर आहे, टिकावू नाही हे कळायला लागते. नंतर मग मन व्यवहारापासून आपोआप बाजूला होतं.*

*तर ही ईश्वरशक्ती म्हणजे प्रेरकशक्ती आहे. ईश्वरानी दिलेली बुद्धी ही आणखी कल्याण करणारी आहे. कर्माप्रमाणे उत्पन्न होणारी बुद्धी ही आणखी चांगलीही होईल आणि वाईटही होईल.*

पण ईश्वर ज्याला बुद्धी देतो, प्रेरणा करतो त्याला ती बुद्धी मिळाल्यानंतर तो शेवटपर्यंत आणखी स्थिरपणे, प्रतिबंधरहीत अशा स्थितीमध्ये साधनाभ्यास त्याचा होतो. आणखी साधनाभ्यासाच्या योगानी पूर्ण समाधी अवस्था, निर्गुण निराकार परमेश्वराचं स्वरुप जे आहे त्या स्वरूपाचं ज्ञान, साक्षात्कार ज्याला आपण म्हणतो ते होऊन जातं.

यांप्रमाणे आपण सर्वांनी हे पारायण म्हणजे वाङ्मयतप ज्याला म्हणता येईल ते आपलं चाललेलं आहे. महाराजांचे ग्रंथ आहेत. ते स्वत: म्हणजे पूर्ण निरहंकार. निरनिराळे ग्रंथ आहेत.

'आपुलिया बळे नाही बोलत । सखा कृपावंत वाचा त्याची ।' तुकाराम महाराज म्हणतायत. वाणीही त्याची आहे. इंद्रिय सगळी बुद्धी त्याची आहे. माझं काही नाही म्हणजे सर्व ठिकाणचा अहंकार, सर्व ठिकाणचा जो अभ्यास आहे, भ्रांती आहे ती कमी झालेली आहे. आणि या स्थितीमध्ये हे ग्रंथ निर्माण झाले लोकांच्या कल्याणाकरता, ईश्वरप्रेरणेनं, त्याचं पारायण आणखी श्रद्धेनं, विश्वासानी, ईश्वरनिष्ठेनं सद्‌गुरुंची निष्ठा धारण करुन आणि आपल्याकडून होतं आहे. अशीच आणखी प्रेरणा ईश्वरानी आपल्याला द्यावी. आणखी जास्तीत जास्त बुद्धी ही शुद्ध, स्थिर होत गेली पाहिजे. बुद्धीची स्थिरता म्हणजेच या सगळ्या अवस्था आहेत. ध्यान, समाधी, साक्षात्कार हे स्थिरतेवर अवलंबून आहेत.

ध्रुवांनी तपश्चर्या केली. सद्‌गुरुंची नारदांची कृपा झाल्याबरोबर

त्याचा उद्धार झालेला आहे. पांच वर्षांचा मुलगा अरण्यामध्ये जाऊन काय करणार? काय करावं काही माहिती नाही. देवाची सेवा, देवाला प्रार्थना करुन, देवाला प्रसन्न करुन घ्यायचं म्हणजे काय करायचं? नारदांनी त्यांची परीक्षा घेतली. देव असा कुठं काय अरण्यात गेल्यावर भेटतो काय म्हणाले. चल म्हणाले मी तुझ्या बापाला सांगतो. त्याच्या मांडीवर त्याच्या सिंहासनावर बैस.

ध्रुव म्हणाला, नको मी आता परत येणार नाही. हा एक निश्चय झालेला आहे ना. काहीतरी एक निश्चय आहे. नाही परत यायचं नाही आता. राजधानीमध्ये मी पाऊल ठेवणार नाही. हरीचं दर्शन झाल्याशिवाय येणार नाही. हा केवढा निश्चय । पूर्वीचं केवढं सुकृत आहे. त्याला म्हणून नारदांनी त्याला सर्वही सांगितलं. आपल्या स्वत:ची शक्ती त्याला दिलेली आहे. ते सांगत गेले तसं त्याला पटत गेलं. त्याची तपश्चर्याही तशीच होती. भगवंताचं दर्शन त्याला होऊन गेलेलं आहे. हा जो आणखी विशेष ईश्वराचा कृपाप्रसाद त्याच्यावर झालेला आहे.

***ईश्वरांनी दिलेली बुद्धी अशा प्रकारची असती. आपल्या मनामध्ये आणखी स्थिरता किती उत्पन्न झालेली आहे? किती प्रतिबंध करणारे दोष आपल्या मनामध्ये आहेत? हा विचार करायचा आणि तो दोष दूर होण्याकरता म्हणून देवाची प्रार्थना करायची आहे.***

***देही अहंता जडली न मोडवे । ग्रहात्मज स्त्री ममता न सोडवे।***
***त्रिताप दावानल पोळीतो मला । दत्ता कृपासावली दे ।***

ही प्रार्थना आहे. अष्टक आहे. कारण सांगतात महाराज, असं म्हणायला हरकत नाही. देवाला इतका आपलेपणा वाटावा की, मी त्याला बुद्धी देतो आणि सगळं करवून घेतो त्याच्याकडून. हे देवालासुद्धा आणखी ज्याच्याबद्दल आत्मीयता उत्पन्न झाली त्याचं सुकृत किती असेल पूर्वी. अर्जुनाला ती काळजी करायची नाही असं सांगितलं. तू कशाला काळजी करतोस. मी सगळं करणार आहे. पाप पुण्याचा विचार करण्याचं तुला कारण नाही. सोडायचं असेल तर पुण्यही सोडावं लागेल. पाप तेवढं देवांनी दिल्याप्रमाणे देवानी करवून घेतलं. देवावर पाप तेवढं आणखी घालतो. पुण्य मात्र माझ्या बुद्धीनं माझ्या इच्छेनं मी केलेलं आहे. पुण्याचा एक अहंकार आपल्याकडे घेतो तर शरणागती याचा अर्थ शेवटी त्यांनी सांगितलेला आहे की पाप पुण्य दोन्हीही म्हणजे बुद्धीच्या द्वारानी जे होणार आहे, बुद्धी मुख्य आहे. आणि बुद्धीच्यामुळे सगळी इंद्रिय, वाणी, शरीर वगैरे सगळेही कार्य करतात. तेव्हां त्या बुद्धीनं जे जे होत आहे ते माझं संबंध नाही. हा एक अहंकार गेला पाहिजे. तो अहंकार गेला म्हणजे आणखी सर्वच कर्म ही पुण्ययुक्त अशा प्रकारची होतात. मनुष्यजन्म हा ईश्वर सेवेकरता प्राप्त झालेला आहे. शरीरानी सेवा झाली पाहिजे. वाणीने झाली पाहिजे. मनानी, बुद्धीनं झाली पाहिजे. तन्मयता त्या बुद्धीला उत्पन्न झाली पाहिजे त्याकरता आणखी स्वत:चा जो विशेष अभिमान आहे तो दूर झाला पाहिजे. कर्तृत्व आपलं नाही याची पक्की जाणीव झाली पाहिजे.

***कोणत्याही कर्माचं कर्तृत्व आपल्याकडं नाहीये वस्तुत:. सर्व प्रवर्तक ती शक्ती आहे. ही सद्‍बुद्धी आपल्याला मिळालेली आहे आणि त्याप्रमाणे ही सेवा आपल्याला घडती आहे. ही वाङ्मय सेवा, वाङ्मय तप आहे, शारीर तप आहे, मानस तप आहे. सगळं सांगितल.***

***संतांचे ग्रंथही आणखी सत्‌शील पुरुषांचं कल्याण होण्याकरताच ईश्वराच्या प्रेरणेनं लिहिलेले आहेत. त्यात त्यांचा स्वत:चा अहंकार काहीही नाहीये. सहज झालेले आहेत ते. द्विसाहस्त्री गुरुचरित्रावर टीका केली महाराजांनी. शेवटी त्यांनी एका पत्रात लिहिलं आहे की ही काही माझी शक्ती नाही. मी किती थोडं शिकलोय. पण ग्रंथ समोर नसतांना टीका झालेली आहे. ही त्या सर्वज्ञ शक्ती संपन्न परमेश्वराची शक्ती आहे. म्हणजे स्वत:चं कर्तृत्व यत्किंचित सुद्धा नाही.***

ज्ञानेश्वरमहाराजही प्रत्येक वेळेला असंच सांगतात. माझं कर्तृत्व नाही. सद्‌गुरुनाथ निवृत्तीमहाराज त्यांचा संकल्प आहे. म्हणून ज्ञानेश्वरी लिहिली. याप्रमाणे अंत:करणात समर्पण भावना ज्याला आपण म्हणतो ती पाहिजे. ***समर्पण याचा अर्थ अहंकार सुटणं. तटस्थ होणं. सेवा करणं हे आपलं कर्तव्य आहे. हा एक निश्चय झाला पाहिजे. आणखी त्याच्यामध्ये ईश्वराचं सहाय्य असावं. एवढी बुद्धी आहे.*** योगसूत्रकारांनी ईश्वरभक्तीची दोन फळं सांगितली. आपण कोण खरे आहोत हा खरा 'अहं पदार्थ' सापडतो. देह मी आहे, इंद्रिय मी आहे, मन मी आहे, बुद्धी मी आहे. असं मी

मी किती ठिकाणी म्हणायचं. किती ठिकाणी एका देहामध्ये किती मी रहायला हवेत. असे अनेक जर मी असते आणि अशी प्रत्येकाची वेगळी वेगळी प्रगती जर झाली तर काय होईल? म्हणून खरा अहं कोण आहे हे त्याला सांगणं. शुद्ध साक्षीरुप मी आहे. प्रेक्षक आहे, तटस्थ आहे. हे अहं च खरं स्वरुप त्याला समजून येतं आणि अहंकार दूर नाहीसा होतो. आणि जे जे काही साधन त्याच्याकडून होतात त्याच्यामध्ये विघ्नही पुष्कळ असतात.

***प्रारब्धकर्म अनेक प्रकारचं आहे. चांगली कर्म सुरु होतात. पण त्याच्यामध्ये विघ्नही उत्पन्न होतात. शरीरामध्ये काही आरोग्य बिघडणं, वाणीमध्ये काही हे होणं, मनामध्ये कंटाळा येणं, पुरे झालं पारायण एका ठिकाणी आता कशाला प्रत्येक ठिकाणी जायचं हा कंटाळाही येतो. संसारामध्ये जेवणाचा, बाकीच्या एकंदर व्यवहाराचा कंटाळा येतो का? तेच तेच संसारातही तेच आहे की. रोज तेच आहे. जेवण तेच आहे. तेच व्यवहार आहेत. दुसरं आहे काय? त्याचा कुठं कंटाळा येत नाही.*** असे काही अनेक दोष आहेत. एकदम काहीतरी वाणीवर परिणाम होतो. असे अनेक दोष आहेत. ते सगळंही प्रतिबंध दूर करण्याचं सामर्थ्य ईश्वरभक्तीमध्ये आहे. ही ईश्वरभक्ती निर्माण झाली पाहिजे. म्हणजे पूर्ण विश्वास ईश्वरशक्तीवर निर्माण झाला, आपल्या बुद्धीला सर्वालाही प्रेरणा करणारी ईश्वरशक्ती आहे, ही भावना झाली पाहिजे. ***ही भावना म्हणजेच ईश्वरार्पण बुद्धी आहे. मी काहीही केलं नाही, करत नाही किंवा करु शकत नाही. ही जाणीव***

***निर्माण झाली आणि या जाणीवेनं हे कर्म होईल ते शुद्ध कर्म आहे.***

***भगवान् गोपालकृष्ण उद्धवजींना उपदेश करताना हेच सांगतात. शुद्ध कर्म कोणचं? मला अर्पण झालेलं शुद्ध कर्म आहे. अर्पण झालेलं याचा अर्थ स्वत: मी करतो आहे हे ज्यांनी सोडून दिलेलं आहे. कर्तृत्वबुद्धी ज्याची दूर झाली हीच ईश्वरार्पण बुद्धी याला म्हणतात. ही ईश्वरार्पण बुद्धी उत्पन्न व्हावी म्हणजे त्याच्या योगानी जे जे काही पुण्यकर्म वगैरे घडल ते सर्वही प्रतिबंधरहित होतं, सर्व प्रतिबंध दूर होतात. हे सहाय्य आहे ईश्वराचं आणि मुख्य म्हणजे खरा अहं सापडतो. शुद्ध अहं.***

कोहळा आंत नासून गेलेला आहे. वरुन चांगला दिसतो आहे. पण आंत नासलेला कोहळा त्याचा काय उपयोग? देह मी आहे, इंद्रिय मी आहे. असे प्रत्येक ठिकाणी अहं आहे. तो जो कुष्मांड आहे कोहळा, तो जसा नासून गेला आहे तसं हे नासलेलं आहे सगळं. खरा अहं आणखी तिथपर्यंत नेऊन पोचिवणं, त्याची बुद्धी शुद्ध करणं, बुद्धी स्थिर करणं हे मोठं काम आहे. केवळ बुद्धीनं हे शक्य नाहीये. ***केवळ प्रयत्नांनी आपली बुद्धी आपल्याला स्थिर होऊ शकते. ध्यानाचा अभ्यास झाला म्हणजे स्थिरता प्राप्त होती आहे. साधना आहे, सगळं आहे. पण ध्यानाचा अभ्यास व्हायला पाहिजे ना. अनेक विचार आहेत मनामध्ये. मनाचा स्वभावच आहे की नेहमी विचारामध्ये एक विचार, दुसरा विचार, अनंत विचार आहेत. अनंत वृत्ती मनाच्या आहेत. त्या सगळ्या***

***वृत्ती कशा बंद व्हायच्या आपल्या प्रयत्नांनी. म्हणून त्या सर्वही वृत्ती आणखी कमी कमी होताना पूर्ण वृत्तीरहित मन, शुद्ध स्थिर मन ज्यावेळेला होईल त्यावेळेला खरं ध्यान लागेल. आणि विषयाचा आणि मनाचा संबंध त्यावेळेला सुटणार आहे. ध्यानाचं फल हे आहे. मन विषयाकडं जातं तर विषय पुन्हा मनामध्ये येतात.***

हे सनतकुमारांनी ब्रह्मदेवांना विचारलेलं आहे. काय करावं म्हणाले, मन जातं इंद्रियांच्याकडं पुन्हा विषयांचा संबंध आला की पुन्हा ते संस्कार होतात. पुन्हा विषय आम्हाला पाहिजे त्याच्यामध्ये सुख आहे. खरं सुख जे आहे ते सापडत नाही. आणि विषयामध्ये सुद्धा बुद्धीनं मन पुन्हा पुन्हा विषयांकडं जाणं, विषय मनामध्ये येणं हे बाजूला कसं करायचं? ब्रह्मदेवांनासुद्धा काय उत्तर द्यावं सुचेना. मग त्यांनी भगवंतांच स्मरण केलं. सूक्ष्मरुपांनी त्याठिकाणी येऊन भगवंतांनी त्यांना हा उपदेश केला, मन आणि विषय सगळे जे पदार्थ आहेत ह्याचा आधार कोण आहे म्हणाले. कुठं उत्पन्न झालेलं आहे सगळं. तिकडं त्याचं ध्यान सुरु झालं पाहिजे. आणि ते ध्यान जितकं जितकं अधिकाधिक होत जाईल, बाहेरच्या विषयांपासून मन बाजूला होत आहे. विषयाचा, मनाचा विभाग, वियोग हा त्यावेळेला घडतो. ध्यानाभ्यास हे त्यांनी सांगितलेलं आहे मुख्य.

**॥ श्री गुरुदेव दत्त ॥**

# - नोंद -

# - नोंद -

# - नोंद -

# - नोंद -